। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २४७ वा । सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ । पृष्ठ ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# महाराष्ट्राच्या अमृत महोत्सवाकडे वाटचाल करताना रचनात्मक कार्यासाठी एकत्र येऊया - मुख्यमंत्री

## राज्याचा विकास थांबणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांचे विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावर प्रतिपादन

**नागपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आजही देशातील सर्वाधिक सक्षम आणि स्थिर असून, सर्व आर्थिक निकषांवर राज्य पात्र ठरत आहे. कर्ज, राजकोषीय तूट, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, सिंचन, वीज, दळणवळण आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात राज्याने भरीव काम केले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना सांगितले. राज्याची अमृत महोत्सवाकडे वाटचाल सुरू असताना पुढचा काळ महाराष्ट्रासाठी अत्यंत निर्णायक असल्याचे नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहातील सर्व नेत्यांना एकत्र येऊन रचनात्मक कार्यातून राज्याला वेगाने पुढे नेण्याचे आवाहन केले.**




विधानसभेत नियम २९३ अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सविस्तर आढावा मांडला. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर आलेल्या विविध आव्हानांना सामोरे जात निर्णयक्षम आणि समन्वयातून कारभार केल्याचे त्यांनी सांगितले. कोविड काळ, विविध अडचणीं याचा उल्लेख करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आता या सर्व गोष्टी मागे टाकून महाराष्ट्र पुढे नेण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे. अमृत महोत्सवी महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेने वाटचाल करताना सभागृहातील सर्वांनी रचनात्मक कामातून राज्याच्या प्रगतीसाठी एकत्र यावे. अमृत महोत्सवाकडे वाटचाल करताना सकारात्मकता आणि विकासकेंद्रित दृष्टिकोन आवश्यक असल्याचे नमूद करत अब आगे बढ़ चुका हूँ मैं अब पग नहीं रुकने वाले, असे म्हणत विकासाच्या मार्गावर राज्याची वाटचाल थांबणार नसल्याचा निर्धार मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. सीबीएसईच्या नव्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाला २१ पानांचा सविस्तर समावेश करण्यात आल्याची माहिती देत त्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले.

### मुंबई महाराष्ट्रातच राहिल

मुंबईबाबत स्पष्ट भूमिका मांडताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुंबई महाराष्ट्राचीच होती, आहे आणि कायम राहील. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात एकशे सहा हुतात्म्यांच्या बलिदानातून महाराष्ट्र घडला असून यासंदर्भात कुठलाही संभ्रम ठेवण्याची आवश्यकता नाही. छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेल्या मार्गावर, संविधानाच्या चौकटीत महाराष्ट्र चालत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविणार

महाराष्ट्रासाठी तयार करण्यात आलेल्या व्हिजन डॉक्युमेंटचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या विकासासाचा रोडमॅप तयार करताना २०३०, २०३५ आणि २०४७ असे तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडवण्याचे उद्दिष्ट असून २०२९-३० दरम्यान देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था महाराष्ट्राची असेल, या दिशेने काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### राज्य शासनाच्या योजना पुढील पाच वर्षेही चालणार

राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, 'लाडकी बहीण' योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज यांसह सर्व योजना सुरू असून त्या पुढील पाच वर्षेही सुरू राहतील, असे ठामपणे त्यांनी सांगितले.

### राज्याची आर्थिक स्थिती मजबूत

राज्याची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशातील मोठ्या राज्यांचा विचार केल्यास आजही सर्व निकषांवर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पात्र ठरते. राज्याच्या विकासासाठी कर्ज उभारणे आवश्यक असते आणि राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत कर्ज उभारण्याची परवानगी असताना, केवळ १८.८७ टक्के कर्ज घेतले आहे. राजकोषीय तूटही (ऋीलरश्र ऊशषळलळीं) तीन टक्क्यांच्या आत राखण्यात यश आले असून, लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांना मदत देऊनही हे शक्य झाले. कॅगने घालून दिलेल्या तिन्ही आर्थिक अटी पूर्ण केल्या असून, केंद्र सरकारने घालून दिलेल्या निकषांपेक्षा जास्त भांडवली गुंतवणूक महाराष्ट्राने केली आहे.

### विदर्भ व मराठवाड्यात गुंतवणुकीचा ओघ

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विदर्भात इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण, स्टील आणि कोल गॅसिफिकेशनमध्ये मोठी गुंतवणूक येत आहे. मराठवाडा 'ईव्ही कॅपिटल' म्हणून विकसित होत आहे, ज्यात टोयोटा, स्कोडा, एथर यांसारख्या मोठ्या ब्रँड्सची गुंतवणूक झाली आहे. मिहानमध्ये ३१ कंपन्या कार्यरत असून नवीन २२ कंपन्या सुरू होत आहे. यातून १ लाख २७ हजार लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. अमरावती विमानतळावर एशियातील सर्वात मोठी हवाई प्रशिक्षण संस्था सुरू होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## क्राईम न्यूज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

**उमरगा /प्रतिनिधी-** पोलीस ठाणे अंतर्गत विष्णु रा. नारंगवाडी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.१२.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घराच्या पाठीमागील असलेल्या पत्र्याचे शेडचे दुकानात नारंगवाडी येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला, व्ही-१ टोबॉको कंपनीच्या पुड्या असा एकुण २२,५०० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला उमरगा पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- १२३, २२३,२७४, २७५ सह कलम ५९ अन्न सुरक्षा मानके कायदा २००६अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

**धाराशिव/प्रतिनिधी-** ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत अंबिका रा. शिंदेवाडी ता. जि. धाराशिव हे दि.१३.१२.२०२५ रोजी १६.३० वा. सु. आपल्या पत्र्याचे शेड समोर शिंदेवाडी येथे अंदाजे ४,८०० किंमतीची ४५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत लैलाबाई रा. माळकरंजा ता. कळंब जि. धाराशिव हे दि.१३.१२.२०२५ रोजी माळकरंजा येथे आपल्या पत्राचे शेडचे बाजूस अंदाजे ७८० किंमतीची १३ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

### आर्थिंग, केबल कटींग, टॉवर डोअर लॉकची चोरी

**नळदुर्ग/प्रतिनिधी-** पोलीस ठाणे अंतर्गत दि.२१.१०.२०२५ रोजी बसवंतवाडी शिवारातील रिन्यु ग्रीन एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि. या कंपनीचे १ अर्थिंगचे केबल, बॉटमम आर्थिंग स्टिरप, स्काडा आर्थिंग स्ट्रिप, केबल कटींग, टॉवर डोअर लॉक एकुण १,००,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रावसाहेब भानुदास शेंडे, वय ४३ वर्षे, रा. हरोली ता. कवठे, महाकाळ जि. सांगली ह.मु. एस टी कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१३.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## तुळजाभवानी मातेच्या मंदिरातील कामास सुरुवात

**तुळजापूर/प्रतिनिधी:** तुळजापूर तुळजाभवानी मंदिरातील जीर्ण झालेला अभिषेक हॉल पाडण्यास प्रारंभ करण्यात आला असून, यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून ठप्प झालेली मंदिरातील विकासकामे पुन्हा सुरू होण्याची आशा व्यक्त करण्यात येत आहे. होणार आहेत. विशेष म्हणजे पुजारी मंडळाचा विरोधामुळे या पूर्वी अभिषेक हॉलचे पाडकाम थांबवण्यात आले होते. तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या स्व निधीतून ५८ कोटी रुपयांची जतन व संवर्धनाची कामे सुरू आहेत. पुरातत्व विभागाचा मार्गदर्शनाखाली विविध सहा टप्प्यात विकासकामे करण्यात येणार असून, यामध्ये देवीचा मुख्य गाभारा वगळता मंदिरातील बहुतांश भाग नव्याने बांधकाम करण्यात येणार आहे. मंदिरातील जतन व संवर्धन कामाचे कंत्राट सावनी कन्स्ट्रक्शन्स मुंबई व साई प्रेम कन्स्ट्रक्शन लातूर या दोन कंपन्यांना देण्यात आली आहेत. मात्र प्रशासनाचा उदासीनतेचा फटका मंदिरातील विकासकामांना बसत असून, मंदिरातील विकासकामे अतिशय संथ गतीने सुरू आहेत. शारदीय नवरात्र महोत्सवाचा पार्श्वभूमीवर थांबवण्यात आलेल्या मंदिरातील विकासकामांना अद्यापही मुहूर्त मिळाला नसून, यामुळे भाविकांची गैरसोय होत आहे. दरम्यान पुजारी मंडळाचा विरोधानंतर थांबवण्यात आलेल्या अभिषेक हॉलचा पाडकाम सुरू झाले. मंदिरातील विकासकामे पुन्हा सुरू होण्याची आशा व्यक्त करण्यात येत आहे. राजकीय कुरघोडीने विकासाला खो तुळजाभवानी मंदिरातील भवानीशंकर दर्शनमंडप व सिंह गाभाऱ्याचे पुनर्निर्माण तसेच चोपदार दरवाजा नजीक एक्झॉस्ट फॅनच्या जागी नव्याने दरवाजा करण्यासह पलंगाच्या दोन्ही बाजूंनी दरवाजा करणे, कडी दरवाजाची रूंदी वाढवणे, होम कुंडा समोरून बाहेर पडण्यासाठी नवीन मार्ग आदी अनेक कामे प्रस्तावित आहेत. मात्र राजकीय कुरघोडीत विकास कामे रखडल्याने भाविकांची गैरसोय होत आहे.

## शेळगावात महाविस्तार एआय बाबत जागृती: कृषी विभागाच्या वतीने माणिकबाबा माध्यमिक विद्यालयात केले योजनांबाबत मार्गदर्शन

**परंडा/प्रतिनिधी :** परंडा तालुक्यातील शेळगाव येथील माणिकबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे, मंडल अधिकारी थोरबोले व कृषी सहाय्यक गुंड यांनी कृषी विभागाच्या महाविस्तार एआय पविषयी मार्गदर्शन करून महाविस्तार एआय हे प डाऊनलोड करून माहिती मिळवण्याचे आव्हान केले. अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष सुभाषराव मोरे हे होते.

परंडा तालुक्यातील शेळगाव येथील माणिकबाबा विद्यालयात इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना महाविस्तार एआय पविषयी माहिती देण्यात आली. सुरुवातीला कृषी सहायक गुंड यांनी प्रास्ताविक करून शेतकऱ्यांना पचा होणारा फायदा याविषयी सविस्तरपणे मार्गदर्शन केले. त्यानंतर तालुका कृषी अधिकारी लांडगे यांनी विद्यार्थी, शेतकरी व पालक यांच्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत एआय तंत्रज्ञान शेतीतील उत्पादन वाढीसाठी किती महत्त्वाचे आहे हे सांगितले .व प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या पालकांना तसेच इतरांनाही एआय प डाऊनलोड करून वापर करण्यासाठी चे आवाहन केले .यावेळी जे विद्यार्थी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना ए आय प विषयी माहिती देऊन प डाऊनलोड करतील त्यांना विशेष बक्षीस देण्यात येईल असे कृषी विभागामार्फत घोषित करण्यात आले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य कुमटकर यांनी आजचे विद्यार्थी हे २०४० च्या दशकातील भारताचे प्रगतशील शेतकरी होणार आहेत त्यांनी एआय तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांना मदत करणे आवश्यक आहे हे सांगितले.

## कामगार चळवळीचे आधारस्तंभ डॉ. बाबा आढाव यांना आदरांजली!

**धाराशिव/प्रतिनिधी-** धाराशिव येथील श्रीकृष्ण नागरी पतसंस्था येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्रातील असंघटित कामगार चळवळीचे प्रणेते, हमाल पंचायतचे संस्थापक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीचे सक्रिय आंदोलनकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

डॉ. बाबा आढाव यांनी हमाल, माथाडी व असंघटित क्षेत्रातील कामगारांना संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी लढा दिला. कामगारांना न्याय, सन्मान व सुरक्षिततेसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला असून सामाजिक न्याय, समता व संविधानाच्या मूल्यांची त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडणी केली. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राज्य अतिरिक्त महासचिव हरिभाऊ बनसोडे, संविधान संरक्षण समितीचे प्रा.डॉ. दिनकर झेंडे,प्रदीप शिंदे, बाळासाहेब माने, प्रभाकर बनसोडे, ॲड. अजित कांबळे तसेच रि.पा.इं. (खरात) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राउत उपस्थित होते.

कार्यक्रमात विजय गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ नामांतर आंदोलनाच्या काळात ठाणे सेंट्रल कारागृहात डॉ. बाबा आढाव यांच्या सहवासातील आठवणींना उजाळा दिला. तसेच हरिभाऊ बनसोडे व प्रा. डॉ. दिनकर झेंडे यांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबा आढाव यांच्या विचारांना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रभाकर बनसोडे यांनी आभार मानले.

तुमची KYC अद्ययावत ठेवा

ज्यामुळे तुमच्या बँकिंग सेवा चालू राहतील



जर तुमचा KYC तपशील बदलला नसेल तर,

पत्र/ऑनलाइन बँकिंग/मोबाइल बँकिंग/एटीएम/तुमच्या बँक किंवा बिझनेस करस्पाँड्ट्सकडे (बीसीज) रजिस्टर असलेल्या तुमच्या मोबाइल नंबर/ईमेलद्वारे Re-KYC साठी स्व-घोषणा सादर करा.

जर तुमचा KYC तपशील बदलला असेल तर,

अपडेटची माहिती देणाऱ्या कोणत्याही कागदपत्राची एक प्रत द्या: आधार/मतदाता ओळखपत्र/NREGA जॉब कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट/नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरने जारी केलेलं पत्र.




आपल्या बँकेच्या जवळच्या शाखेत जाऊनही KYC अपडेट करू शकता.

अधिक माहितीसाठी, https://rbikehtahai.rbi.org.in/KYC वर जा

अधिकृत व्हॉट्सअॅप नंबर्स: 99990 41935/99309 91935

सार्वजनिक हितार्थ जारी

भारतीय रिझर्व्ह बँक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## मितभाषी, शिवराज पाटील चाकूरकर

शिवराज पाटील चाकूरकर यांना कोणी ओळखत नाही असे नाही. देशात परिचित असणारे नेते होते. त्यांच्या आकस्मित निधनाने सर्वांना दुःख होत आहे. शिवराज पाटील यांनी लातूरचे नाव देशात गाजविले. सातवेळा खासदार असणारे नेते होतेच, अनेक केंद्रात यशस्वी खाती चांगल्या प्रकारे सांभाळणारे होते. त्यांना प्रचंड अभ्यासी ज्ञान होता. कधी-कधी त्यांनी व्यक्त केलेले विचार हे, विचार करायाला लावणारे होते. अतिषय उच्च कोटीचे विचार व ज्ञान भांडार त्यांच्याकडे होता. सर्व प्रकारचे ज्ञान आवगत होते. आंतराळ, तंत्रज्ञान, विज्ञान असे कठिण विषयावर बोलताना समोरचा व्यक्ती हा गांगारून जात होता. एवढे मोठे ज्ञान होते. अल्प संपर्क आला असला तरी ते ज्ञानाचे भांडार होते. विद्वान असल्याने त्यांना देशातील जनता काय सर्व राजकिय नेते आपुलकिने बोलत असत. त्यांचा विरोधक नव्हता. वास्तविक राजकारणात विरोधकांची संख्या कमी नसते मात्र एकमेव शिवराज पाटील यांना विरोधक नव्हता. असे म्हणणे चुकीचे ठरणारे नाही. शिवराज पाटील जसे काँग्रेसचे नेते होत त्याच प्रमाणे भाजपाशी चांगले संबंध होते. एकवेळा तर भाजपाचे जेष्ठ नेते अटलबिहारी बाजपायी लोकसभेच्या प्रचारार्थ लातूरात आले असताना राजस्थान शाळेच्या भव्य प्रचारसभेत 'शिवराज पाटील हे अच्छे आदमी है' असे विचार व्यक्त केले. त्यावेळी सर्व वातावरण फिरले व शिवराज पाटील सहज निवडून आले. ज्या-ज्यावेळी लातूरला येत त्यावेळी भेटणाऱ्यांची संख्या बरी होती. शिवराज पाटील म्हणजे लातूरची शान होती. लातूरातील तीन थोर मंडळी होऊन गेली. शिवराज पाटील हे केंद्रात अग्रगण्य नेते होते तसेच राज्यात शिवाजीराव पाटील निलंगेकर होते. निलंगेकर हे स्वातंत्र्य सैनिक होते. मराठवाडा मुक्ती संग्रामात भाग घेतला होता. राज्याचे मुख्यमंत्री बनले, त्यानंतर ज्यांना विकास नेते म्हणून ओळखतो असे विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते. त्याना तर तोडच नव्हती, त्यांना केंद्रात काम करण्याची संधी मिळाली. केंद्रात मंत्रीपदी विराजमान असताना प्राणज्योत मावळली. ते विकास पुरूष होते. असे त्रिमुर्तींनी लातूरचे नाव गाजविले. देशात कोठेही गेलो तरी या तिघांना ओळखणारे असंख्य सापडतील. शिवराज पाटील चाकूरकर यांचे कार्य सर्वांना माहिती आहे. त्यांना जर योग्य वाटले तरच काम निश्चित करीत. लबाडी त्याच्याकडून कदापी दिसून आली नाही. लातूरच्या अशोक हॉटेल समोरील रेट हाऊसमध्ये आल्यावर त्यांना भेटणाऱ्याची संख्या अधिक होते. ते अशोक हॉटेलच्या मागे राहात असत. यावेळी प्रत्येकांना ते भेट दिल्याशिवाय लातूर सोडत नसत. त्यांच्या प्रचारात सहभागी होण्याचा योग आला. त्यावेळी त्यांनी प्रचारात पातळी कधी घसरू दिली नाही. आताची प्रचाराची पातळी व त्यावेळी शिवराज पाटील चाकूरकर यांची प्रचाराची पातळी उच्च होती. निवडणुक समोरच्या व्यक्तीवर कधीही शिंतोडे उडविले नाहीत. निवडणुक जिंकल्यावर मैत्रीचे संबंध ठेवत, भेटत, फोन करत, बोलावुन घेत असत. असे उच्च राजकारणी होते. दिल्लीत गेल्यावर लातूर जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तीची आपुलकीने चौकशी करीत होते. त्यांचे विचार श्रेष्ठ होते. कधीही गैर प्रकाराचा डाग लागला नाही. अनेक वर्ष राजकारणारत असून ते निष्कलंक शेवट पर्यंत राहीले. लातूरच्या जनतेची एक शान होती. ते देशाचे नेते होते. त्यानुसार त्यांनी देश पातळीवर विकासाची कामे केली. लातूरकरांच्या विकासाबाबत अनेक भावना होत्या. दिल्लीत एवढे वजन होते की, कोणीही त्यांना नाही म्हणत नव्हते. ते इतर मंत्रीगणास एखादे काम सांगितले तर झालेच समजा.एक वेगळी छाप दिल्लीत होती. गांधी घराण्यांची त्यांची जवळीकता होती, केवळ ते बुद्धीमान होते म्हणून त्यांना गांधी घराण्याशी जवळीकता दिसून येत होती. त्यांचा स्वभाव लातूरकरांना माहिती असल्याने काही आंतरावर राहणारे बरेच होते. त्यांना लबाड खपत नव्हते. गोरगरीब व सामान्यांना ते कदापी दूर करीत नसत. विशेष बाब म्हणजे कौटुंबिक संकटे आली तरी हिंमतीने तोंड देणारे सामार्थ्यवान होते हे विसरता येत नाही. मराठवाड्यात सुरवातीच्या काळात दोन दिग्गज होते. एक नांडेडचे शंकरराव चव्हाण व लातूरचे शिवराज पाटील यांचे दिल्लीत वजनदार नेते होते हे मान्यच केले पाहिजे. शिवराज पाटील यांनी लातूरचे नाव गाजविले. कमी बोलणे व अधिक कामे करणे हा त्यांचा हातखंड होता. एक हुशार व अनुभवी असे नेते असल्याने त्यांच्यावर सर्वांचे प्रेम होते. कधी रागावले असे कधीही दिसले नाहीत. राग आला तर गप्प राहणारे एकमेव राजकिय नेते असतील. त्यांना भेटायाचे झाले तर विचारपुर्वक व विचारकरून भेटणाऱ्यांची संख्या कमी होती. ते वादात कधीही पडले नाहीत. उलट वाद निर्माण करणारे कोसे दूर असतांना पाहिले आहे. अनेक काळ खासदार व केंद्रात मंत्री असणारे नेते असल्यांना त्यांना अनुभव दांडगा होता. केवळ त्यांच्या प्रेम असणारे असंख्य नागरिकांच्या जोरावर ते बहुमतानानी लातूर लोकसभामतदार संघातून निवडूण येत असत. एकदा पराभुत झाल्यावर त्यांना देशाचे गृहमंत्रीपद मिळाले हे लातूरकरांची मोठी स्वाभिमानाची बाब होती. त्यांचा प्रवास लातूरचे नगराध्यक्षापासून झाला. जनसामान्याची सतत आठवण ठेवणारे नेते होते. नेते आले म्हणजे कार्यकर्त्यांचा गोंधळ पाहाताना अनेकांनी पाहिला असेल, मात्र शिवराज पाटील आले की, गोंधळ नाही. सर्वांना शांततेत भेट, कडक सुरक्षा यंत्रणेचा त्रास देवघर येथे कोणालाही जाणवला नाही. एक आगळे-वेगळे नेते होते. असे नेते पुन्हा घडतील असे वाटत नाही. विरोधक जर त्यांची प्रशांसा करीत असतील तर तो सर्वमान्य नेताच म्हणावे लागेल. त्यांच्या जाण्याने सर्वांना दुःख होणे स्वाभाविक आहे. कधीही कोणाला त्रास दिला नाही. कोणालाही नाराज केले नाही. सर्वांशी प्रेमाने वागणारे नेते होते. विशेष बाब म्हणजे एखाद्या समाजाचा नेता असेल तर त्यांच्या समाजाची मंडळी वेगळीच वागते मात्र शिवराज पाटील यांनी समाज म्हणजे माझ्या मतदार संघाबरोबर देशातील जनता मानत असत. शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन ही धक्कादायक बाब आहे. त्यांच्या जाण्याने दुःखतर होतेच, त्यापेक्षा त्यांचे जीवन प्रणाली प्रत्येकांनी अंगीकारली पाहिजे. राजकारणारच काय सर्व क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी शिवराज पाटील चाकूरकर यांचे जीवन अंगीकारले पाहिजे. त्यांचा गुण अंगीकारला पाहिजे. तरच जीवन यशस्वी होईल. सर्वांना शिवराज पाटील आपल्यात नाहीत हे मान्य होणार नाही. त्यांची आठवण प्रत्येकाच्या हृद्यात दिर्घ काळ राहणार आहे हे नक्की!

# दयानंद एज्युकेशन सोसायटीस राष्ट्रीय ऊर्जा संवर्धनाचा पुरस्कार आनंदाची पर्वणी

## - लक्ष्मीरमण लाहोटी (अध्यक्ष, दयानंद शिक्षण संस्था,लातूर)






ऊर्जा कार्यक्षमता ब्यूरो, भारत सरकार ऊर्जा मंत्रालयद्वारा ऊर्जा कार्यक्षमतेत अनुकरणीय उत्कृष्ट कामगिरीसाठी दयानंद एज्युकेशन सोसायटीस राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार- २०२५ हा पुरस्कार दुसऱ्यांदा मिळाला ही संस्थेसाठी अभिमानास्पद बाब आहे. १४ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन म्हणून साजरा होणाऱ्या नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात भारताच्या ऊर्जा मंत्रालयाच्या माध्यमाने भारताच्या महामहीम राष्ट्रपती माननीय श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमात सदरील पुरस्कार दिला गेला. माझ्यासह दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेशजी बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव ॲड. श्रीकांत उटगे, सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी व नोडल अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड व संस्थेचे इतर पदाधिकारी आणि सदस्य व लातूरचे नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर होणार ही आनंदायी गोष्ट आहे.

दयानंद शिक्षण संस्था केवळ शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य नसून विद्यार्थी,प्राध्यापक, कर्मचारी आणि समाजोपयोगी कामासाठी नेहमी पुढाकार घेते. तसेच दयानंद एज्युकेशन सोसायटीकडे ऊर्जा संवर्धन प्रयत्नाचा एक मजबूत वारसा आहे.कारण दयानंद विज्ञान महाविद्यालयाला भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाकडून २०२२ मध्ये राष्ट्रीय ऊर्जा संवर्धनाचा प्रथम पुरस्कार मिळाला. प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व नोडल अधिकारी डॉ. एल. व्ही. ठाकरे यांनी दरवर्षी ०.०३८ दशलक्ष युनिट विद्युत ऊर्जा बचत केल्याबद्दल १४ डिसेंबर २०२२ रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते तो पुरस्कार स्वीकारला होता. संस्थेच्या दयानंद विज्ञान महाविद्यालयाने ऊर्जा संवर्धनासाठी व्यापक उपायोजना राबविल्या त्यामुळेच आमच्या प्रयत्नांना राष्ट्रीय पातळीवर यश आले.

**विज बचतीसाठी विविध उपक्रम :** दयानंद एज्युकेशन सोसायटी अंतर्गत असलेल्या सर्वच महाविद्यालयात एलईडी बल्ब, ५- स्टार रेटेड उपकरणे, मोशन सेन्सर्स आणि एलईडी स्ट्रीट लाइटिंगचा वापर केला जातो. अक्षय ऊर्जा निर्मितीसाठी इमारतीच्या छतावर वेगवेगळ्या क्षमतेचे (१० किलोवॅट, १५ किलोवॅट, २० किलोवॅट, ३० किलोवॅट, सौर पॅनल बसवले जातात. सेंसर आधारित प्रणाली पाण्याचे पंपिंग आणि वीज वापर नियंत्रित करतात.पावसाचे पाणी साठवण आणि कचरा व्यवस्थापन यासारख्या व्यापक शाश्वत उद्दिष्टांना आम्ही समर्थन देतो.

**ऊर्जा बचतीसाठी जागरूकता कार्यक्रम:** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या वतीने वार्षिक कार्यक्रमांमध्ये ऊर्जा संवर्धन प्रतिज्ञा, पीसीआरएद्वारे कार्यशाळा, जागतिक जैवइंधन दिन साजरा करणे आणि भागधारकांसाठी संवेदनशीलता कार्यक्रम आदींचा समावेश आहे. २०२३ मध्ये सरकारी पाठिंब्याने सुरू झालेला ग्रीन क्लब, जलसंवर्धन आणि वृक्षारोपणासोबतच ऊर्जा कार्यक्षमतेला प्रोत्साहन देतो. नियमित हरित आणि ऊर्जा ऑडिट २०१५ पासूनचे अहवाल आमच्याकडे उपलब्ध असून त्यात सतत सुधारणा करतो. याशिवाय ऊर्जा संवर्धनासाठी दयानंद शिक्षण संस्थेतील प्राध्यापक व विद्यार्थी विविध उपक्रम राबवित लातूर जिल्ह्यामधील विविध शाळा, महाविद्यालयांत जावून ऊर्जा बचतीचा संदेश देतात व ऊर्जा बचतीची प्रतिज्ञाही घेतात.

**संशोधन:** सौर ऊर्जेसंबंधित संशोधनातही दयानंद विज्ञान महाविद्यालय हे नेहमी अग्रेसर असून त्या संबंधित संशोधन प्रकल्पावरती कार्य सातत्याने चालू असते. याचबरोबर ऊर्जेचा वापर कमी करण्यासाठी सौर पॅनलसारख्या अक्षय नैसर्गिक संसाधनाचा वापर करण्यासाठी अनेक उपक्रमांसह दयानंद परिसराची रचना केली गेलेली आहे. वर्ग खोल्या,सेमिनार हॉल, विद्यार्थी समस्या निर्मूलन केंद्र व विविध महाविद्यालयांतील विविध ठिकाणी एलईडी बल्ब बसविण्यात आलेले आहेत. विशेषता जलसंधारण, ऊर्जेच्या पर्यायी स्त्रोतांचा वापर, घनकचरा व्यवस्थापन, हरितपट्टा विकास आणि इमारतीच्या टिकाऊ वस्तू डिझायनरवर लक्ष केंद्रित करून नेहमी अशा गोष्टींच्या वापरासाठी प्रयत्न करून वेळोवेळी मार्गदर्शनही केले जाते. त्याचबरोबर दयानंद एज्युकेशन सोसायटी प्रामुख्याने दयानंद सायन्स कॉलेजमधील भौतिकशास्त्र संशोधन केंद्र आणि त्यांच्या थिन फिल्म्स आणि साहित्य विज्ञान संशोधन प्रयोगशाळेद्वारे मटेरियल सायन्स आणि सौर पेशींमध्ये सशक्त संशोधन केले जाते. हे केंद्र नॅनोमटेरियल, थिन फिल्म्स (जसे की, पातळ चुंबकीय अर्धवाहक, फेराइट्स, ऑक्साईड थीन फिल्म्स), सौरपेशी अनुप्रयोग आणि गॅस सेंसिंगवर लक्ष केंद्रित करते.प्राध्यापक आणि विद्वानांना नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी प्रगत उपकरणांचा वापर करून उपयोजित विज्ञानात महत्त्वपूर्ण योगदान देते. थिन फिल्म्स, नॅनोमटेरियल, सौर ऊर्जा, गॅस सेन्सिंग ही प्रमुख संशोधन केंद्र आहेत. दयानंद विज्ञान महाविद्यालयास यूजीसी (कॉलेज विथ पोटेंन्शियल फॉर एक्सलन्स) डीएसटी-फिस्ट रूसाद्वारे मान्यता प्राप्त महाविद्यालयाचा भाग आहे.

**एनर्जी ऑडिट :** दयानंद एज्युकेशन सोसायटी एनर्जी ऑडिट आणि कार्यक्षमता उपायांचे तपशीलवार वर्णन करणारे एक समर्पित ऊर्जा संवर्धन पृष्ठ ठेवते. मागील अहवाल इनपुट संतुलित करणारे आणि बचतीच्या संधी ओळखणारे पद्धतशीर ऊर्जा ऑडिट दर्शवतात. हे प्रयत्न महाराष्ट्रात शैक्षणिक शाश्वतेमध्ये समाजाला एक अग्रगण्य म्हणून स्थान देतात. संस्थेनी ऊर्जा कार्यक्षमता ब्यूरो, भारत सरकार ऊर्जा मंत्रालयद्वारा मान्यताप्राप्त एनर्जी ऑडिटर केदार खमितकर व किरण खमितकर यांच्या माध्यमातून एनर्जी ऑडिट सातत्याने केले जाते.

**आयएसओ मानांकन:** दयानंद एज्युकेशन सोसायटीचे क्यूआरओद्वारे स्वतंत्रपणे मूल्यांकन केले गेले आहे. आयएसओ ५०००१-२०१८ ऊर्जा व्यवस्थापन प्रणालीद्वारे ग्रामीण भागातील गरजूंना मदत करणे,शिक्षण,आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात सेवा देणे यासाठी संस्था नेहमी पुढाकार घेते.आयएसओ ५०००१ हे ऊर्जा व्यवस्थापन प्रणालीसाठी एक आंतरराष्ट्रीय मानक आहे,जे संस्थांना ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यास मदत करते. ते ईएनएमएसची स्थापना,अंमलबजावणी, देखभाल आणि सतत सुधारणा करण्यासाठी एक चौकट प्रदान करते.

**नॅकचा दर्जा:** दयानंद शिक्षण संस्थेतील दयानंद विज्ञान महाविद्यालय, दयानंद वाणिज्य महाविद्यालय, दयानंद फार्मसी महाविद्यालय इत्यादी महाविद्यालयास नॅकची ए-प्लस मान्यता व इतर राष्ट्रीय नामांकित मान्यतासोबतच ऊर्जा संवर्धनासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रथम पुरस्कार पुरस्काराचा दर्जाही आहे. संस्थेची दयानंद कला, विधी व इतर महाविद्यालय सर्व क्षेत्रात पुढे आहेत. दयानंद शिक्षण संस्थेचे नावलौकिक केवळ मराठवाड्यातच नव्हे तर राज्य, देशपातळीवर आहे.

**मान्यता व संस्थेचे धोरण :** दयानंद कॅम्पसकडे लातूर महानगरपालिकेकडून हरित आणि स्वच्छ प्रमाणपत्र मिळाले आहे.ते ई-निविदाद्वारे औपचारिक ऑडिट करते.या प्रयत्नाला टिकवून ठेवण्यासाठी धोरणे कागदविरहित प्रशासन, ई-कचरा पुनर्वापर आणि प्लास्टिकमुक्त पद्धतीवर आम्ही भर देतो.

**आयजीबीसी सदस्य :** आयजीबीसी किंवा इंडियन ग्रीन बिल्डींग कौन्सिल,शाश्वत बांधकाम पद्धतीना प्रोत्साहन देण्यासाठी बांधकाम उद्योगातील भागधारकांना सदस्यता देते.सदस्यत्व संसाधने, नेटवर्किंग आणि ग्रीन बिल्डिंग उपक्रमांमध्ये प्रवेश प्रदान करते. संस्था आणि व्यक्तीसाठी विविध श्रेणी अस्तित्वात आहेत. शैक्षणिक श्रेणीमध्ये दयानंद शिक्षण संस्थेस आईजीबीसी सदस्यत्व प्रदान करण्यात आलेले आहे.

**एलईडी स्क्रीन स्मार्ट बोर्ड:** जुन्या इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्डऐवजी (सामान्यतः प्रोजेक्टर-आधारित प्रणाली) एलईडी स्मार्ट बोर्ड (इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले) वापरल्यास विजेच्या ऊर्जेची लक्षणीय बचत होते. ऊर्जा बचतीची तुलना जुन्या प्रोजेक्टर-आधारित प्रणाली, या प्रणालींमध्ये सामान्यतः जास्त वॅटचे बल्ब वापरले जातात आणि त्या मोठ्या प्रमाणात वीज वापरतात, प्रोजेक्टर आणि सोबतच्या पीसी/बोर्ड प्रणालीसाठी अनेकदा प्रति तास सुमारे १००० वॅट्स वीज लागते.त्या अधिक उष्णता देखील निर्माण करतात,ज्यामुळे वातानुकूलनाचा खर्च वाढू शकतो.

**आधुनिक एलईडी स्मार्ट बोर्ड (आयएफपीडीएस):** हे ऊर्जा-कार्यक्षम एलईडी तंत्रज्ञानाचा वापर करतात,ज्यामुळे विजेचा वापर लक्षणीयरित्या कमी होतो. अनेक मॉडेल्स आकार आणि सेटिंग्जनुसार,प्रति तास केवळ ६७-२०० वॅट्स इतकी कमी वीज वापरतात,जी विजेच्या वापरात एक मोठी घट आहे. दयानंद शिक्षण संस्थेमध्ये असे १२० स्मार्ट बोर्ड बसवले आहे.

**उर्जा व्यवस्थापनाचा महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार:** दयानंद विज्ञान महाविद्यालयाला ऊर्जा संवर्धनाच्या प्रयत्नासाठी मेडा (महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था) कडून २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापनातील उत्कृष्टतेसाठी १७ वा पुरस्कार(तिसरा पुरस्कार) मिळाला. हा राज्यस्तरीय पुरस्कार संस्थेच्या शैक्षणिक शाश्वत पद्धतीबद्दल सतत सततच्या वचनबद्धतेवर निश्चितच प्रकाशझोत टाकणारा आहे.

दयानंद शिक्षण संस्थेनी ऊर्जा बचत व संवर्धनासाठी राबविलेले विविध उपक्रम व केलेले विविधांगी प्रयत्न यामुळेच विद्यापीठ व महाविद्यालय श्रेणीमध्ये राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार-२०२५ भारताच्या ऊर्जा मंत्रालयातर्फे १४ डिसेंबर २०२५ रोजी पुरूस्कृत केला जाईल. ऊर्जा संवर्धनाचा हा देश पातळीवरील दुसऱ्यांदा पुरस्कार दयानंद शिक्षण संस्थेला मिळत आहे,ही लातूरच्या व दयानंद शिक्षण संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आम्हा सर्वांसाठी आनंदाची पर्वणी आहे...




# हार्ट अटॅक येण्यापूर्वी तुमच्या हातामध्ये दिसतात 'ही' लक्षणे; लगेच घ्या तज्ज्ञांचा सल्ला



सध्याच्या काळात केवळ वयस्कर व्यक्ती नव्हे तर तरूणांना देखील हृदयाच्या समस्यांचा सामना करावा लागतोय. ही सम स्या वाढली की हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो. ज्यामध्ये रुग्णांचा मृत्यूही होऊ शकतो. अशा परिस्थितीत हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी या लक्षणांकडे अधिक लक्ष देणं आवश्यक आहे. जर तुम्हाला हृदयविकाराच्या झटका टाळायचा असेल तर त्याच्या लक्षणांकडे अधिक लक्ष द्या.

हृदयविकाराच्या लक्षणांकडे वेळीच लक्ष दिल्यास हृदयविकाराचा धोका टाळता येतो. हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणं केवळ छातीतच दिसत नाहीत, तर हाताच्या आसपासही दिसून शकतात. जाणून घेऊया हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी हातामध्ये तुम्हाला कोणत्या प्रकारची लक्षणं दिसून येतात.

हातावर सतत सूज येणं

हातावर सूज येणं हे देखील हृदयविकाराचा झटका येण्यास सूचित करू शकतं. हे एक अतिशय गंभीर लक्षण असू शकतं. अशी लक्षणे दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

हातात मुंग्या येणे

हाताला मुंग्या येणं या लक्षणाकडे दुर्लक्ष करू नका. हे लक्षण देखील देखील हृदयविकाराचा झटका सूचित करू शकतं. ही लक्षणे दिसताच ताबडतोब डॉक्टरांकडे जा.

हात सुन्न होणं

हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी रुग्णांना केवळ पाय आणि छातीभोवती अस्वस्थता जाणवत नाही. तर काही वेळा रूग्णांचे हातही सुन्न पडू शकतात. हृदयविकाराचा झटका आल्यास तुमचं हात सुन्न होऊ शकतात. अशी लक्षणं दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

डाव्या हातामध्ये सतत वेदना

हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी रुग्णांच्या डाव्या हाताम ध्ये खूप वेदना होऊ शकतात. जर तुम्हाला असा त्रास खूप होत असेल तर अशा परिस्थितीत एकदा तुमच्या आरोग्य तज्ज्ञाची मदत घ्यावी.

हात अचानक थंड पडणे

हात वारंवार थंड पडत असतील तर हृदयविकाराचा झटका येण्याचे हे लक्षणे मानले जाते. जर तुमचे हात खूप थंड होत असतील तर एकदा डॉक्टरांची मदत घेणे फायदेशीर ठरू शकते.

# हा ब्लू चहा नसांमध्ये साचलेली घाण काढण्यास करेल मदत, एलडीएल कोलेस्ट्रॉलवर नैसर्गिक आणि घरगुती उपाय

शंभरातून ९० टक्के लोकांना आज कोलेस्ट्रॉलची समस्या आहे. डॉक्टरांनुसार प्रत्येकाच्या शरीरात चांगले आणि वाईट असे कोलेस्ट्रॉल असतं. खराब कोलेस्ट्रॉल वाढल्यास रुग्णांला अनेक गंभीर आजाराचा सामना करावा लागतो. बदललेली जीवनशैली आणि खाण्यापिण्याचा सवयीमुळे अनेक आजारांनी आपण ग्रासलोय. खराब कोलेस्ट्रॉलचा त्रास असल्याने शिरांम ध्ये चरबी जमा होते. या चरबीचा नाश करण्यासाठी सध्या निळा रंगाचा चहा ट्रेंडिंगमध्ये आहे. ग्रीन टीनुसारच आता ब्लू टी वजन कमी करण्यापासून कोलेस्ट्रॉलचा नशा करण्यासाठी फायदेशीर आहे, असं आहारतज्ज्ञ सांगत आहेत.

काय आहे निळा चहा

हा निळा चहा म्हणजे अपराजिता फुलाच्या पानांपासून बनवला चहा आहे. फक्त चहा प्यायल्याने हे खराब चरबी रक्तवाहिन्यांमधून साफ होण्यास मदत मिळते असं तज्ज्ञांचा दावा आहे. हे रक्तवाहिन्यांमधून चरबी काढून टाकतं आणि रक्त परिसंचरण सुधारण्यास मदत मिळते, असं सांगण्यात आलंय.

अपराजिता फ्लॉवर टीचे फायदे!

कोलेस्ट्रॉल कमी करण्यात प्रभावी

अपराजिता चहामध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि फ्लेव्होनॉइड्स असतात, जे नसांमध्ये जमा होणारे खराब कोलेस्ट्रॉल कमी मदत करतं. हे नसांमध्ये उष्णता निर्माण करून खराब कोलेस्टेरॉल लिपिड्स वितळवते आणि हे एलडीएल पातळी कमी करण्यास फायदेशीर ठरतं. त्याच वेळी एचडीएल पातळी वाढण्यासही मदत मिळते.

रक्तदाब नियंत्रित करते

अपराजिता चहामुळे उच्च रक्तदाबही नियंत्रणात राहण्यास फायदेशीर ठरते. हे कोलेस्ट्रॉलची पातळी योग्य राहते. याशिवाय ते हृदयासाठीही खूप फायदेशीर आहे असं तज्ज्ञ सांगतात. यात व्हॅसोरलेक्सेशन गुणधर्म आहेत, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत मिळते.

हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका कमी होते

उच्च कोलेस्ट्रॉलच्या बाबतीत अपराजिताच्या पानांचा चहा प्यायल्याने हृदय आणि मज्जातंतू निरोगी राहण्यास मदत मिळते. यामध्ये आढळणारे अँटीथ्रोम्बोटिक रक्त गोठण्यास प्रतिबंध करण्यास फायदेशीर ठरते. यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो, असं तज्ज्ञ सांगतात. हृदयरोगींनी अपराजिता चहाचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

अपराजिता चहा कसा बनवायचा

अपराजिताच्या फुलांपासून चहा बनवणे खूप सोपे असून यासाठी पहिल्यांदा दोन ते तीन अपराजितांची फुलं घेऊन ती वाळवा. नंतर ते गरम पाण्यामध्ये चांगले उकळवा. पाणी निळे दिसू लागले की ते एका कपात गाळून घ्या आणि त्यात मीठ, लिंबू आणि साखर घालून त्याच सेवन करा. साखर ऐवजी तुम्ही मधही टाकू शकता.

## झेंडूचा चहा पिण्याचे आरोग्यदायी फायदे

जर तुम्हाला दररोज तोच चहा पिण्याचा कंटाळा आला असेल, तर तुम्ही झेंडू चहा नक्कीच वापरून पहावा.झेंडू चहा नियमितपणे पिण्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत. हिवाळ्यात काकडी खाणे फायदेशीर आहे की हानिकारक?

झेंडू चहा हा हलका, सुगंधित आणि हर्बल, आरोग्यदायी चहा आहे.

तो प्यायल्याने तुमच्या शरीराला ताजेतवाने आणि आराम मिळतो. त्याची चव हलकी आणि फुलांची आहे. जर तुम्ही तुमच्या नेहमीच्या चहापेक्षा काहीतरी वेगळे शोधत असाल तर तुम्ही झेंडू चहा नक्कीच वापरून पहावा.

## महिलांनी हार्मोनल समस्यांसाठी दररोज हे योगासन करावे

ज्या महिलांना हार्मोनल असंतुलन, अनियमित मासिक पाळी इत्यादींमुळे होणारी लक्षणे दिसतात त्यांच्यासाठी काही योगासने एक प्रभावी उपचार आहेत. पीसीओडी किंवा पीसीओएस असलेल्या महिलांना अनियमित मासिक पाळी, वजन वाढणे, चेहऱ्यावरील नको असलेले केस, हार्मोनल असंतुलन आणि आई होण्याची चिंता यांचा सामना करावा लागू शकतो. डॉक्टर हार्मोनल संतुलन राखणे, इन्सुलिन प्रतिरोध आणि ताण व्यवस्थापन यांचा सल्ला देतात.

हिवाळ्यात हे आसन अनेक समस्या दूर करते, कसे करायचे जाणून घ्या



विज्ञान असे सुचवते की योगाचा या तिन्हींवर थेट परिणाम होतो. म्हणूनच तज्ञ योगा हा पीसीओएससाठी प्राथमिक उपचार मानतात. योग म्हणजे फक्त व्यायाम नाही; तो शांती, संतुलन आणि महिलांचे आरोग्य सुधारण्याचा एक नैसर्गिक मार्ग आहे. नियमित योगाभ्यास शरीराला आराम देतो, गर्भाशयाचे आरोग्य सुधारतो आणि चयापचय वाढवतो. स्त्रीरोगतज्ज्ञांनी महिलांना ही योगासने करण्याचा सल्ला दिला आहे. चला तर मग जाणून घेऊ या.

जर तुम्ही हार्मोनल बॅलन्ससाठी योगा करत असाल तर महिन्यातून किमान पाच दिवस ३० मिनिटे सराव करा. तथापि, जर तुमची प्रकृती गर्भधारणेदरम्यान किंवा गर्भधारणेदरम्यान बिघडली तर तुम्ही प्रथम तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

तुमच्या दिनचर्येत प्रथिनेयुक्त आहार, कमी साखरेचा आहार आणि पुरेशी झोप यांचा समावेश करणे अधिक प्रभावी ठरू शकते.

एका महिन्यात वजन कमी करण्यासाठी हे योगासन करा

पीसीओडी/पीसीओएस मध्ये मदत करण्यासाठी प्रभावी योगासने

भुजंगासन-थायरॉईड आणि गर्भाशयाचे कार्य सक्रिय करते आणि हार्मोन्स संतुलित करते. भुजंगासनाच्या नियमित सरावाने पोटाची चरबी कमी होण्यास मदत होते. सराव करण्यासाठी, पोटावर झोपा. दोन्ही तळवे जमिनीवर ठेवा आणि तुमचे शरीर वर करा. १० ते १५मिनिटे या स्थितीत रहा.

सेतुबंधासना-सेतुबंधासनामुळे ताण आणि पाठदुखी कमी होते. याचा सराव केल्याने पेल्विक क्षेत्रात रक्ताभिसरण वाढते. सराव करण्यासाठी, पाठीवर झोपा, गुडघे वाकवा आणि तुमचे पाय तुमच्या कंबरेजवळ आणा. श्वास घ्या आणि कंबरे वर उचला. ३० सेकंद धरा आणि हळूहळू कमी करा.

बालासन-बालासन केल्याने मानसिक ताण कमी होतो आणि कॉर्टिसोल कमी होतो. यामुळे हार्मोनल संतुलन राखण्यास मदत होते. बालासन करण्यासाठी, गुडघे टेकून, कपाळ जमिनीवर ठेवा आणि तुमचे हात पुढे किंवा बाजूला पसरवा.. पश्चिमोत्तानासन

हे आसन अंडाशय आणि गर्भाशयाच्या स्नायूंना बळकटी देते. नियमित सरावाने मासिक पाळी सुधारते. पश्चिमोत्तानासन करण्यासाठी, तुमचे पाय सरळ पसरवून बसा. श्वास घ्या आणि तुमचे हात वर करा आणि श्वास

# शालीन, सुसंस्कृत नेता काळाच्या पडद्याआड

पाच दशकांचा संसदीय राजकारणाचा अनुभव असलेले फारच मोजके नेते भारतात आहेत. त्यात शिवराज पाटील चाकूरकर हे एक होते. लिंगायत समाजाची महाराष्ट्रातील लोकसंख्या सुमारे ऐंशी लाख असली, तरी ती विखुरलेली आहे. तसा तो अल्पसंख्य समाज म्हणावा लागेल. या समाजाचे असलेल्या शिवराज पाटील यांनी प्रदीर्घ काळ राजकारणात जम बसवणे हा त्यांच्या संघटन कौशल्याचा आणि त्यांच्या पक्षावरील निष्ठेचाही परिपाक होता. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष तसेच लोकसभेचे अध्यक्ष होणारे ते एकमेव व्यक्ती आहेत. यावरून त्यांच्या कर्तृत्वाची कल्पना येते.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहमंत्री शिवराज पाटील यांनी त्यांच्या जन्मभूमी लातूरमध्येच अखेरचा श्वास घेतला. लातूर जिल्ह्याने महाराष्ट्राला दोन मुख्यमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री दिले. सक्रिय राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर शिवराज पाटील चाकूरकर दिल्लीत स्थायिक झाले होते. एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी लातूरला आले असताना त्यांची तब्येत खालावली. त्यांना उपचारासाठी दिल्लीला हलवण्याची तयारी सुरू होती; परंतु त्यांनीच नकार दिला. घरीच उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालावली.

१९७० च्या दशकात त्यांनी राजकारणात प्रवेश केला. लातूरचे नगराध्यक्ष, आमदार ते खासदार, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, लोकसभेचे अध्यक्ष, राज्यपाल आदी विविध पदे त्यांनी भूषवली. मराठी, हिंदी, इंग्रजी अशा भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. विविध संसदीय समित्यांतील कामकाजावर त्यांचा प्रभाव होता. शेवटच्या श्वासापर्यंत काँग्रेसच्या राजकारणात ते सक्रिय राहिले. त्यांना स्वच्छ प्रतिमेचे नेते मानले जाते. १९८० नंतर त्यांनी लातूर संसदीय मतदारसंघातून अनेक वेळा निवडणूक जिंकली आणि लोकसभेत पोहोचले. त्यांनी केंद्रात मंत्री म्हणून काम केले आणि राज्यपाल म्हणूनही काम केले. मध्यमवर्गीय कुटुंबातून पुढे येऊन स्वकर्तृत्वावर त्यांनी मजल मारली. गांधी कुटुंबावरची अविचल निष्ठा आणि कोणत्याही गटबाजीत न रमणारे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. अतिशय स्वच्छ चारित्र्य ही त्यांची आणखी एक जमेची बाजू. चाकूरने महाराष्ट्राला एक शिवाजीराव निलंगेकर यांच्यासारखा मुख्यमंत्री आणि शिवराज पाटील यांच्यासारखा गृहमंत्री देशाला दिला. ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांनी शिक्षणाची वाटचाल केली; पण शैक्षणिक गुणवत्तेबाबत ते सदैव कटाक्षाने प्रयत्नशील राहिले. महाविद्यालयीन काळात त्यांना सामाजिक कामांची विशेष आवड निर्माण झाली. युवक मंडळे आणि विद्यार्थी संघटनांमध्ये काम करताना नेतृत्वाची ताकद त्यांच्यात विकसित झाली. ग्रामीण भागातील बेरोजगारी, पायाभूत सुविधांची कमतरता आणि शिक्षणात जाणवणार्या अडचणी त्यांनी जवळून पाहिल्या.



शिवराज पाटील यांनी १९६७-६९ दरम्यान लातूरचे नगराध्यक्ष म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी १९७३ ते १९८० पर्यंत लातूर ग्रामीण मतदारसंघातून आमदार म्हणून काम पाहिले. १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघ जिंकला आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये संरक्षण राज्यमंत्री म्हणून पहिल्यांदाच मंत्री झाले. १९८० ते १९९९ पर्यंत सलग सात वेळा लोकसभा जिंकून शिवराज पाटील यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर राष्ट्रीय राजकारणातही आपले स्थान निर्माण केले. शिवराज पाटील यांचा राजकीय प्रभाव केवळ इंदिरा गांधींच्या सरकारमध्येच नव्हे, तर डॉ. मनमोहन सिंग सरकारमध्येही दिसून आला. त्यांनी पी.व्ही. नरसिंह राव यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली यूपीए सरकार स्थापन झाल्यावर ते सर्वांत शक्तिशाली मंत्री बनले. संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश आणि महासागर विकास आदी मंत्रालयांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये त्यांना कार्मिक आणि संरक्षण उत्पादन मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यानंतर त्यांनी नागरी विमान वाहतूक आणि पर्यटनाचा स्वतंत्र कार्यभार सांभाळला. त्यांनी लोकसभेचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, संसदीय कामकाजाचे थेट प्रक्षेपण आणि नवीन ग्रंथालय इमारत यांना गती दिली. त्यांनी देशांतर्गत आणि परदेशात अनेक संसदीय परिषदांमध्ये भारताचे नेतृत्व केले. सभापती म्हणून काम करत असताना त्यांनी १९९२ मध्ये उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराची स्थापना केली. त्यांनी संसद सदस्यांना माहितीचे वितरण, संसद ग्रंथालय इमारतीचे बांधकाम आणि संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये प्रश्नोत्तराच्या तासाचे थेट प्रक्षेपण यासारखे निर्णय त्यांनी घेतले. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत शिवराज पाटील यांचा पराभव झाला, तरीही सोनिया गांधी यांनी त्यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवला. ते राज्यसभेवर निवडून आले आणि डॉ. सिंग यांच्या सरकारमध्ये त्यांना केंद्रीय गृहमंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली. तथापि, २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर, त्यांनी सुरक्षेतील त्रुटींची नैतिक जबाबदारी स्वीकारून ३० नोव्हेंबर २००८ रोजी राजीनामा दिला.

शिवराज पाटील हे सत्य साई बाबा यांचे कट्टर अनुयायी मानले जातात. विविध मंत्रालयांमध्ये काम करणे आणि लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम करणे यासह सुमारे पाच दशकांचा संसदीय आणि प्रशासकीय अनुभव असलेले शिवराज पाटील हे भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे आणि ज्ञानी व्यक्तिमत्त्व होते. ते एक शालीन सुसंस्कृत पिढीतील नेते होते. व्यर्थ बडबड करणे, नाहक टीका करणे ते नेहमी टाळत. राजकीय मूल्य जपण्यात त्यांची हयात गेली. काँग्रेसच नाही तर विरोधकांमध्ये पण त्यांचे मित्र होते. राजकीय टीका टिप्पणी होत असली, तरी या मैत्रीत कधी अंतर आले नाही. त्यांनी टाऊन हॉलमध्ये ग्रंथालय उभारले. लातूरमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले. त्यावेळी अनेक दिग्गजांनी या ग्रंथालयाला आवर्जून भेट दिली. देशाच्या राजकारणातील स्वच्छ, अभ्यासू आणि संयमी नेतृत्वासाठी ते ओळखले जात. त्यांच्या अनुभवी नेतृत्वाची, साधेपणाची आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीची ओळख आजही कायम आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामीण विकास आणि शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमांमुळे त्यांचे नाव चर्चेत आहे. शांत स्वभाव, स्पष्ट बोलणे आणि सातत्याने कामाला प्राधान्य देणारी वृत्ती ही त्यांच्या नेतृत्वशैलीची ओळख मानली जाते. राजकारणात प्रवेश केलेल्या अनेक नव्या चेहर्यांमध्ये शिवराज पाटील चाकूरकर हे व्यक्तिमत्त्व वेगळे ठरते. कारण त्यांनी सत्ता किंवा पदापेक्षा कामाला अधिक महत्त्व दिले. एक विश्वासार्ह समाजनेते म्हणूनही त्यांची ओळख होती. राज्यापासून दिल्लीतील सत्ता, केंद्रापर्यंत त्यांनी उच्च पदे भूषवली; पण तरीही त्यांनी कधीही आक्रमक राजकारण केले नाही. काँग्रेसकडून राष्ट्रपतिपदासाठी त्यांचे नाव निश्चित झाले होते, ऐनवेळी प्रतिभाताई पाटील यांचे नाव पुढे आल्याने त्यांची संधी हुकली होती. सर्वच पक्षात त्यांचा सन्मान होता.

लातूर येथे ते भाजपचे डॉ. गोपाळराव पाटील यांच्या विरोधात खासदारकीची निवडणूक लढवत होते. अटल बिहारी वाजपेयी यांची लातूरात सभा झाली होती. त्यावेळी वाजपेयी यांच्या तोंडून शिवराज पाटील 'अच्छे आदमी' है, असे विधान केले होते. ती निवडणूक पाटील यांनी जिंकली होती. राजकारणात कुरघोडी करणे, एकमेकांचे पाय ओढणे, पाठ फिरली की विरोधात बोलणे असे प्रकार काही नवीन नाहीत. त्याला शिवराज पाटील अपवाद होते.

२००४ ला तर विलासराव देशमुख आणि गोपीनाथ मुंडे यांनी मिळून रूपाताई पाटील निलंगेकर यांना चाकूरकर यांच्या समोर उभे करून पराभव केला, हे जगजाहीर होते. अगदी लातूर शहरातील बाबासाहेब आंबेडकर पार्कवर झालेल्या कार्यक्रमात शिवराज पाटील चाकूरकर व्यासपीठावर असताना मुंडे यांनी मी आणि विलासराव देशमुख यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांना कसे लोकसभा निवडणुकीत पाडले, याची जाहीर कबुली दिली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून चाकूरकर यांनी एक शब्द आपल्या भाषणात काढला नाही किंवा नंतरदेखील त्या निवडणुकीचा कोठे उल्लेख केला नाही. कोणाच्या विरोधात बोलणे किंवा लूज टॉक करणे, अगदी आपल्या विरोधकांविषयी देखील अपशब्द काढणे हेदेखील चाकूरकर यांच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य राहिले.

**--प्रा.अशोक ढगे**

## लैंगिक संवेदना गोठणे

डॉक्टर टीप्स



हे कळावयास हवे. तिला सहवासाबाबत आत्मविश्वास वाटावयास हवा आणि त्याबाबत वाईट विचार न येता स्वत:ची जबाबदारी कळावी. जर पती पत्नं मधील संबंध खेळकर असतील त हे घडू शकते. आणि त्याच वृत्ती नंतर मुलांमध्ये आढळून येतात. त्यामुळे कुटुंबामध्ये आरोग्यदायी आणि खेळकर वातावरण वाढीस लागेल आणि तेच नंतर समाजामध पसरेल .

**तत्त्वाच्या नाही तर, आमचा फायद्याच्या राजकारणावर विश्वास आहे!!**



## विनोद

आई : अरे बाळू, छोटी का रडतेय.

बाळू : अगं, तिला अंगणात हौद खणून हवाय.

आई : मग दे की खणून.

बाळू : दिला खणून पण ती म्हणतेय आता तो घरात आण.

## संदेश

Ek aadmi:-kyon bachche yeh gend tumhari hai?

Bachcha:- uncle kya isse koi sheesha toota hai?

Aadmi:-nahin to..

bachcha:- haan to phir meri hai.

## सुविचार

वक्ता म्हणजे राष्ट्राचे मुखच आहे.

**- जोसेफ रॉक्स**



**अनायुष्यं दिवा स्वप्नं तथाभ्युदितशायिता ।।अनुशासन पर्व, अध्याय १०४,**

अर्थ - दिवसा झोप घेणे आणि सूर्योदयानंतर निजून राहणे हे आयुष्याला हानिकारक आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. याचेच होते फुलपाखरू
४. डोंगरातील खाचाखोचा
७. मधमाशी (संस्कृत)
१०. चविष्ट
११. जास्वंदीचा मूळ रंग
१२. भांडण
१३. बालिश, अपरिपक्व
१५. पातळ खांब
१७. दृष्टीभेट
२०. 'सुवर्णा' याअर्थी मुलींचे एक नाव
२१. शूर
२३. बटाट्याचा सर्वपरिचित पण भाजणीचाही चांगला
२४. मालक
२५. पर्वा
२६. चर्चा
२८. खोडकर
२९. नाजूक
३१. सोनेरी हरीण
३३. चेहऱ्यावरील तेज
३४. सत्व
३६. हिरवे
३७. गरजू
३९. गर्व म्हणजे थोडक्यात याची बाधा!
४०. समुद्र
४२. मुलगी
४३. निर्धन
४५. किल्ली, खटका
४६. प्रचंड, भारी
४८. जनन
४९. शारीरिक वा मानसिक वेदनेने अस्वस्थ होणे
५१. प्रामाणिक
५३. युद्धक्षेत्र
५५. पंकज
५६. अतिशय कृश माणसाला दिली जाणारी 'मत्स्याहारी' उपमा
६०. काढलेली सुट्टी
६१. मामाची बायको
६२. जगरूढी
६४. तमाशातील कलाकार
६७. श्वापद
६९. गोडी
७१. कांद्याचे पान
७२. मूळ अर्थ परवानगी, आता सुट्टी!
७३. प्रहार, आघात
७५. याचे चक्र कधीही उलट फिरवता येत नाही
७६. हळदीचा अधिक उष्ण व सुगंधी प्रकार
७७. गीत गायन
७८. कायदेशीर
८१. गवत
८३. जवळीक, घनिष्ठ संबंध
८४. अथर्वशीर्ष इ. गणपती स्तवन
८५. उलट, विरुद्ध

### उभे शब्द

२. फसविणारा
३. प्रफुल्लित
४. उसाचे आडवे तुकडे
५. विद्या
६. संगोपन
७. कामदेव
८. देव्हारा
९. कर्णोपकर्णी
१२. वाहणारी हवा
१३. पूर्वीच्या 'बघण्याच्या' कार्यक्रमातील पदार्थ
१४. ठाकरे परिवाराने चालवलेला खोपोली येथील वृद्धाश्रम
१६. धोक्याचा इशारा
१८. चित्रकलेचे रंग तयार करण्यासाठी फक्त याचेच तेल वापरतात
१९. वजनदार
२२. रमापती
२४. टक्कर
२६. पण-परंतु (हिंदी)
२७. चलाख, हुशार
२९. काळा असला तरी उगाळून संपतो!
३०. उत्कर्षाचा काळ
३२. शिकार
३५. नटवणे
३८. बंगाल
४१. हत्ती
४२. हात धुण्याचे पात्र
४४. भक्कम, मजबूत
४५. मुंबईची ओळख असणारा वास्तुप्रकार
४७. प्रवासी पोळी, दसऱ्याची तिथी
४८. शेजारी शेजारी
५०. तारेवरची तारांबळ
५१. सामोपचार
५२. असा आनंद चांगला नाही!
५४. मौज करणे
५५. अंगरखा
५७. काटकसर
५८. कापसाचे फळ
५९. न्यारी चव
६३. पुरुष,६५. शिक्षा
६६. पाठवणी
६८. पाठ फिरवणे
७०. च्या बरोबर
७१. रस्त्यावर पहिला हक्क यांचा
७४. दात
७७. थंड,७८. बोच, ठणका
७९. ढीग
८०. पुढे 'शास्त्र' जोडल्यास फसवेगिरीच अधिक!
८२. रात्र, रजनी

### आडवे उत्तरे

१.सुरवंट ४.कडेकपार ७.मधुमक्षिका १०.चवदार ११.लाल १२.वाद १३.पोरकट १५.वासा १७.नजरानजर २०.हेमा २१.वीर २३.वडा २४.धनी २५.तमा २६.मसलत २८.वांड २९.कोमल ३१.कांचनमृग ३३.रया ३४.कस ३६.हरीत ३७.गरजवंत ३९.ग ४०.सागर ४२.तनया ४३.गरीब ४५.चावी ४६.जबरदस्त ४८.जन्म ४९.तळमळणे ५१.साव ५३.समरभूमी ५५.कमळ ५६.सुकट बोंबिल ६०.रजा ६१.मामी ६२.जनरीत ६४.तमासगीर ६७.जनावर ६९.रस ७१.पात ७२.रजा ७३.वा ७५.काळ ७६.आंबहळद ७७.गाणे ७८.सनदशीर ८१.चारा ८३.सलगी ८४.गणेशस्तुती ८५.विपरीत

### उभे उत्तरे

२.वंचक ३.टवटवीत ४.करवा ५.कला ६.पालन ७.मदन ८.मखर ९.कानोकानी १२.वारा १३.पोहे १४.रमाधान १६.सावधान १८.जवस १९.जड २२.रमाकांत २४.धडक २६.मगर २७.तरतरीत २९.कोळसा ३०.लहरबहर ३२.मृगया ३५.सजविणे ३८.वंग ४१.गज ४२.तस्त ४४.बळकट ४५.चाळ ४७.दशमी ४८.जवळजवळ ५०.कसरत ५१.साम ५२.असुरी ५४.मजा मारणे ५५.कमीज ५७.कतरबेत ५८.बोंड ५९.लज्जत ६३.नर ६५.सजा ६६.रवानगी ६८.नाकारणे ७०.सह ७१.पादचारी ७४.रद ७७.गार ७८.सल ७९.शीग ८०.वास्तु ८२.रात



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### ८० धावांवर ऑलआऊट झाली असती आफ्रिका, पण त्या ३७ धावा टीम इंडियाला महागात पडणार

मुंबई-धर्मशालाच्या मैदानावरील तिसऱ्या टी२० सामन्यात साऊथ आफ्रिका ११७ धावांवर ऑल आऊट झाली आहे.या सामन्यात पहिल्या ओव्हरपासून भारताने भेदक गोलंदाजी केली होती. त्यामुळेच साऊथ आफ्रिका ऑल आऊट झाली होती.पण आफ्रिकात ८० धावातच ऑल आऊट झाली असती. पण आफ्रिकेने अतिरीक्त ३७ धावा काढल्या आहेत. या धावा आता टीम इंडियाला महागात पडणार आहे.खरं तर टीम इंडियाने सूरूवातीपासून भेदक गोलंदाजी केली होती.या गोलंदाजीसमोर साऊथ आफ्रिकेच्या फलंदाजांच्या निभाव लागत नव्हता.त्यामुळे आफ्रिकेचे झटपट विकेट पडत होते. भारतीय गोलंदाजांनी पहिल्यांदा सलामीवीरांना स्वस्तात बाद केले.त्यानंतर कर्णधार मार्करमने एका बाजूने डाव सावरसा होता.पण दुसऱ्या बाजूने एकामागून एक विकेट पडत होते.
आफ्रिकेचे ७७ धावांवर ७ विकेट पडले होते.त्यामुळे ८० आणि ९० धावात आफ्रिका ऑल आऊट होईल असे वाटत होते. पण मार्करमने एकट्याने ६१ धावांची खेळी करून आफ्रिकेचा डाव १००च्या पार नेला होता.त्यामुळे साऊथ आफ्रिका ११७ धावांवर ऑल आऊट झाली होती. आता ८० धावांवर समजा साऊथ आफ्रिका ऑल आऊट झाली असती. तर टीम इंडियाला बरंच होतं. पण त्यात आफिकेने आणखीन ३७ धावा काढल्या होत्या. आता याच धावा टीम इंडियाला महागात पडणार आहेत.

### अर्शदीप सिंगचे दमदार कमबॅक, गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेला ११७ धावांवर रोखले

धर्मशाला-भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसरी टी २० मॅच धर्मशाला येथे सुरु आहे. भारताचा कॅप्टन सूर्यकुमार यादव यानं टॉस जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सूर्यकुमार यादवचा हा निर्णय अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा या दोघांनी सार्थ ठरवत सुरुवातीला दक्षिण आफ्रिकेला धक्के दिले. आफ्रिकेचे फलंदाज यातून शेवटपर्यंत सावरु शकले नाहीत. दक्षिण आफ्रिकेनं प्रथम फलंदाजी करताना ११७ धावा केल्या. अर्शदीप सिंग, हर्षित राणा, कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. भारताला विजयासाठी आता ११८ धावा करायच्या आहेत.दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी दुसऱ्या टी २० सामन्यात भारताच्या गोलंदाजांची धुलाई केली होती. मात्र, तिसऱ्या टी २० सामन्यात अर्शदीप सिंग आणि हर्षित राणानं दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना फटकेबाजी करु दिली नाही. पॉवरप्लेमध्ये दक्षिण आफ्रिकेची धावसंख्या ३ बाद २५ अशी होती. अर्शदीप सिंगनं दुसऱ्या टी २० मॅचमध्ये ४ ओव्हरमध्ये ५४ धावा दिल्या होत्या. अर्शदीपनं तिसऱ्या टी २० मॅचमध्ये कमबॅक करत ४ ओव्हरमध्ये २ विकेट घेत १३ धावा दिल्याएडन मारक्रम यानं एकट्यानं किल्ला लढवला-भारताच्या गोलंदाजांपुढं दक्षिण आफ्रिकेच्या इतर फलंदाजांना फटकेबाजी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेचे दोन्ही सलामीवर २ धावांवर तंबूत परतले. रीझा हेंड्रिक्स, क्विंटन डीकॉक, डेवाल्ड ब्रेविस, ट्रिस्टन स्टब्स, कॉर्बिन बॉश, मार्को यानसेन या फलंदाजांना दोन अंकी धावसंख्या देखीलल करता आली नाही.

### 'प्रोजेक्ट महादेवा' मधून गुणवान खेळाडू मिळतील : मुख्यमंत्री

मुंबई-मिशन ऑलिम्पिक २०२६ अंतर्गत महाराष्ट्रातून अधिकाधिक सुवर्णपदके मिळवणे आणि २०३४ पर्यत फुटबॉल विश्वचषकासाठी तयारीचे लक्ष्य ठेवून 'प्रोजेक्ट महादेवा' राबवण्यात येत आहे.या प्रोजेक्टमधून नक्कीच गुणवान खेळाडू मिळतीलअशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनातर्फे 'प्रोजेक्ट महादेवा' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचा शुभारंभ आज वानखेडे स्टेडियम येथे करण्यात आला. 'प्रोजेक्ट महादेवा' हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (चख-ढठअ), व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (तडढऋ), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (थखऋअ), सिडको (उखऊज) आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी, अर्जेंटीनचे माजी खेळाडू लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डिपॉल, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, खासदार प्रफुल्ल पटेल, भारतरत्न सचिन तेंडुलकर, भारतीय लोकप्रिय फुटबॉलपटू सुनील छेत्री, भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार राहुल भेके, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन, जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल मधील प्रतिभेचा (१३ वर्षाखालील) शोध घेवून फुटबॉल मधील उच्च दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी सुरू करण्यात आला आहे.

# भारताचा दक्षिण आफ्रिकेवर एकतर्फी विजय

## टीम इंडियाचे गोलंदाज ठरले किमयागार; मालिकेत मिळवली आघाडी



खछऊ ीं डअ ३ीव ढ२०ख: भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसऱ्या टी-२० सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिका संघावर एकतर्फी विजय मिळवला.
भारतीय संघाने तिसऱ्या टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिका संघावर ७ विकेट्सने एकतर्फी विजय मिळवला. शिवम दुबेने १६व्या षटकात एक चौकार व षटकार लगावत त्याने संघाचा विजय निश्चित केला. या विजयासह भारतीय संघ पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-१ ने आघाडीवर पोहोचला आहे. भारताच्या गोलंदाजांनी या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली, ज्यामुळे संघ विजय मिळवण्यात यशस्वी ठरला.
भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसरा सामना हिमाचल प्रदेश क्रिकेट स्टेडियम धरमशाला येथे खेळवला गेला. या सामन्याची नाणेफेक जिंकत भारताने दक्षिण आफ्रिकेला फलंदाजीसाठी पाचारण केलं. दक्षिण आफ्रिकेची सुरूवात फार खराब झाली. यामुळे संघ २० षटकांत फक्त ११७ धावा करू शकला. तर प्रत्युत्तरात भारतीय संघाने १६.५ षटकांत सामना सहज जिंकला.
दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या ११८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संघाची सुरूवात एकदम दणक्यात झाली. अभिषेक शर्माने पहिल्याच चेंडूवर षटकार खेचत सामन्याला सुरूवात केली. अभिषेक शर्मा १८ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ३५ धावा करत बाद झाला. तर शुबमन गिलने २८ चेंडूत ५ चौकारांसह २८ धावा केल्या. अभिषेक बाद झाल्यानंतर संघाच्या धावांना ब्रेक लागला. तर सूर्यकुमार यादव व तिलक वर्माच्या जोडीने संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पण सलग दोन चौकारांनंतर १२ धावा करत झेलबाद झाला. दक्षिण आफ्रिकेची भेदक गोलंदाजी सुरू असताना भारताचे फलंदाज सावधगिरीने फलंदाजी करत होते. काही षटकं एकही चौकार वा षटकार मिळत नव्हता. पण सूर्याने बाद होण्यापूर्वी दोन चौकार लगावत हा दबाव खोडून काढला.
सूर्या बाद झाल्यानंतर आलेल्या शिवम दुबेने ४ चेंडूंत १ चौकार व एक षटकारासह १० धावा केल्या. तर तिलक वर्मा ३४ चेंडूंत ३ चौकारांसह २५ धावा करत नाबाद परतला. दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी एनगिडी, मार्को यान्सन व कार्बिन बॉश यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

## फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी मुंबईत; क्रिकेटची पंढरी विठ्ठलाच्या उपस्थितही झाली फुटबॉलमय!



मुंबई-आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू ज्याचे चाहते भारतासह संपूर्ण जगभरात परसले आहेत. असा अर्जेंटिनाचा स्टार खेळाडू लिओनेल मेस्सी रविवारी (१४ डिसेंबर) मुंबईत दाखल झाला आहे. आपल्या या हिरोची झलक पाहण्यासाठी त्याचे तमाम चाहते रविवारी चर्चगेट परिसरात दाखल झाले होते.
चर्चगेट परिसरात हजारो चाहते दाखल : एरव्ही क्रिकेटप्रेमींच्या रंगात रंगणारं वानखेडे स्टेडियम रविवारी पूर्णपणे फुटबॉलमय झालेलं पाहायला मिळालं.
चर्चगेट स्टेशनहून वानखेडेकडे जाणाऱ्या गल्लीत तर एक वेगळाच उत्साह ओसंडून वाहत होता. चाहत्यांनी खचाखच भरलेल्या वानखेडे स्टेडियममधील या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासह बॉलिवूड स्टार अजय देवगण, टायगर श्रॉफ आणि भारताचा स्टार फुटबॉलर सुनील छेत्री यांचीही विशेष उपस्थिती होती.प्रोजेक्ट महादेवाची सुरूवात : या निमित्ताने राज्य सरकारच्या क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (थखऋअ) यांच्या संयुक्त विद्यमानं राज्यात फुटबॉल खेळाचा विकास करण्याच्या उद्देशानं 'प्रोजेक्ट महादेवा' या महत्त्वाकांक्षी योजनेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. 'प्रोजेक्ट महादेवा' या योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील युवा खेळाडूंना फुटबॉलमध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वानखेडे स्टेडियमवर हा सोहळा पार पडला. या योजनेअंतर्गत १३ वर्षाखालील खेळाडूंची निवड चाचणी महिन्याभरापूर्वी नेरुळ येथील यशवंत राव चव्हाण फुटबॉल मैदानात पार पडली होती. या निवड चाचणीत एकूण ४१९ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. ज्यातील ४० गुणवान खेळाडूंची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. ज्यात २० मुलं आणि २० मुलींचा समावेश आहे.
याच मुलांना रविवारी वानखेडे स्टेडियमवर आमंत्रित करण्यात आलं असून त्यांना थेट लिओनेल मेस्सीकडून फुटबॉलचे धडे गिरवण्याची संधी देण्यात आली.
प्रोजेक्ट महदेवा अंतर्गत निवड झालले खेळाडू (मुलं) : आर्यव्रत आशिष सारस्वत, निहार विकास नांबियार, आर्य राममूर्ती नायडू, दैविक कमलेश गलानी, रणवीर सिंह चावला, आरव चंद्रकांत सोनवणे, मल्हार लक्ष्मीकांत सावंत, अनय अमित भुसकुटे, तनिष चंद्रशेखर मल्लि, आर्यन संतोष पिंगळे, लक्ष्य नरेश मळकर, गिरीश मेनन, एफ्रॉन ॲग्रेलो डिसा, कनिष्क संजय मिश्रा, निहार कृष्ण एस, तनय रंजीत, शीहान बॅनर्जी, विहान नागधर बांदी, स्वरित संजय सातपुते आणि हर्षित नरेंद्र निकम.
प्रोजेक्ट महदेवा अंतर्गत निवड झालले खेळाडू (मुली) : स्वयंप्रभा महाराणा, जीविका राजपूत, निहारिका सुरेश, हना खान, स्वर विक्रम कुदळे, नव्या पाटील, जीविका रुपेजा, कृतिका राय, दुर्वा तर्मळे, रेबेका सिबी, समायरा सिग, कियाराह अनिरुद्ध सराफ, मन्नत धीरज आहुजा, अक्षरा आदर्श शेट्टी, आश्मी आदर्श शेट्टी, आरझू विकास कदम, लावण्य रविंद्र ठाकरे, अनु मेघा रूपेश, त्रयी प्रभाष शेट्टी व फाटक इराम

## भारत-पाकिस्तान संघांमधील वाद सुरूच!





### यु१९आशिया चषकातही आयुष म्हात्रेने हस्तांदोलन केले नाही; दुर्लक्ष करत ; पाहा काय घडले?

मुंबई-भारत आणि पाकिस्तानचे संघ पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर आमनेसामने आले आहेत. सध्या सुरू असलेल्या अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेत दोन्ही कट्टर प्रतिस्पर्धा संघांमध्ये सामना खेळवला जात आहे. भारताच्या अंडर-१९ संघाचे नेतृत्त्व आयुष म्हात्रे करत आहे. दरम्यान आयुष म्हात्रेने आज १४ डिसेंबरला सुरू असलेल्या सामन्यात पाकिस्तानच्या कर्णधाराशी हँडशेक केलं नाही. नाणेफेकीदरम्यान काय घडलं, पाहूया.
भारत अंडर-१९ आणि पाकिस्तान अंडर-१९ संघांमध्ये दुबईतील आयसीसी अकॅडमी ग्राऊंडवर गट टप्प्यातील सामना खेळवला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाने नो हँडशेक पॉलिसी कायम ठेवली. दुबईमध्ये पाऊस पडत असल्याने हा सामना उशिराने सुरू झाला आणि त्यामुळे सामन्याची षटकं कमी करण्यात आली. ४९ षटकांचा हा सामना खेळवला जात आहे, ज्यामध्ये प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघ २४० धावांवर सर्वबाद झाला.



पाकिस्तानचा कर्णधार फरहान युसूफने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, त्यानंतर दोन्ही कर्णधारांनी एकमेकांशी नजर देखील मिळवली नाही आणि नंतर एकेक करून प्रेझेंटरला मुलाखती दिल्या आणि ड्रेसिंग रूममध्ये निघून गेले. क्रिकेटपासून राजकीय तणाव दूर ठेवण्याचे आयसीसीने आवाहन करूनही बीसीसीआयने त्यांच्या नो हँडशेक धोरणावर पुनर्विचार केलेला नाही.
आशिया चषक २०२५ दरम्यान भारतीय पुरुष संघाने सुरू केलेल्या नो-हँडशेक प्रोटोकॉलचे पालन सर्व आयसीसी स्पर्धांमध्ये केलं जात आहे. त्यांनी स्पर्धेतील तिन्ही सामन्यांमध्ये पाकिस्तानशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला आणि त्यांनी आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वी, जे पाकिस्तानचे गृहमंत्री देखील आहेत, यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. आयसीसी महिला विश्वचषकादरम्यानही भारतीय महिला संघाने पाकिस्तानच्या संघाशी हस्तांदोलन केलं नाही.
पाकिस्तान अंडर-१९ संघाने सामन्याची नाणेफेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. आयुष म्हात्रेने संघाला चांगली सुरूवात करून दिली. तर वैभव सूर्यवंशी ५ धावा करत बाद झाला. आयुष २५ चेंडूत ४ चौकार व ३ षटकार लगावत ३८ धावा करत बाद झाला. यानंतर ॲरोन जॉर्जने संघाचा डाव सावरला. त्याने ८८ चेंडूत १२ चौकार व एका षटकारासह ८५ धावांची उत्कृष्ट खेळी केली. यानंतर विहानने १२ धावा, वेदांत त्रिवेदी ७ धावा तर अभिज्ञान कोंडूमे २२ धावांची खेळी केली. तर कनिष्क चौहानने ४६ धावांची खेळी केली. यासह भारतीय संघाने पाकिस्तान अंडर-१९ संघाला विजयासाठी २४१ धावांचे लक्ष्य दिले आहे.

## यशस्वी जैस्वालचा शतकी दणका; सर्फराझची अर्धशतकी साथ, मुंबईने पार केले द्विशतकी लक्ष्य

मुंबई-भारताच्या टी२० संघात स्थान पक्के करण्याच्या दृष्टीने यशस्वी जैस्वालने रविवारी दमदार पाऊल टाकलं. सय्यद मुश्ताक अली स्पर्धेच्या सुपर लीग गटाच्या सामन्यात यशस्वीने तडाखेबंद शतक झळकावले. पुण्याजवळच्या अंबी इथल्या डीवाय पाटील अकादमी मैदानावर झालेल्या या लढतीत हरयाणाने मुंबईसमोर २३५ धावांचं मोठं लक्ष्य दिलं होतं. मात्र यशस्वीच्या खणखणीत शतकाच्या बळावर मुंबईने १५ चेंडू आणि ४ विकेट्स राखून सामना जिंकला.
मुंबईचा कर्णधार शार्दूल ठाकूरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. खेळपट्टीतला ओलसरपणा गोलंदाजांना साहाय्यकारी ठरेल हा अंदाज सपशेल चुकला. हरयाणाने फलंदाजांना अनुकूल खेळपट्टीवर धावांच्या राशी ओतल्या. हरयाणाचा कर्णधार अंकित कुमारने ४२ चेंडूत १० चौकार आणि ६ षटकारांसह ८९ धावांची दिमाखदार खेळी साकारली. निशांत सिंधूने ३८ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारासह नाबाद ६३ धावांची खेळी करत त्याला चांगली साथ दिली. समांत जखरने १४ चेंडूत ३१ धावांची तर सुमीत कुमारने ४ चेंडूत १६ धावांची उपयुक्त खेळी केल्या. हरयाणाने २० षटकात २३४ धावांचा डोंगर उभारला. मुंबईचा कर्णधार शार्दूल ठाकूरने स्वत:सह ६ गोलंदाजांचा प्रयोग केला पण साईराज पाटीलचा अपवाद वगळता कोणालाही विकेट्स पटकावता आल्या नाहीत.
मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वाल आणि कर्णधार अजिंक्य रहाणे जोडीने चौथ्या षटकातच अर्धशतकी सलामी दिली. इशांत भारद्वाजने रहाणेला बाद करत ही जोडी फोडली. त्याने १० चेंडूत २१ धावा केल्या. यानंतर यशस्वी-सर्फराझ जोडीने मनमुराद फटकेबाजी करत मुंबईच्या विजयाचा पाया रचला. या जोडीने ३७ चेंडूत ८८ धावा चोपून काढल्या. अवघ्या २५ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांसह ६४ धावांची खेळी करून सर्फराझ बाद झाला. अंगक्रिश रघुवंशी (७) तर सूर्यांश शेडगे (१३) मोठी खेळी करू शकले नाहीत. कर्णधार शार्दूल ठाकूरही दोन धावा करून तंबूत परतला. एकीकडे विकेट्स पडत असतानाही यशस्वीने आक्रमण सुरुच ठेवलं. यशस्वीने ४८ चेंडूतच शतक गाठलं. टी२० क्रिकेटमधलं त्याचं हे चौथं शतक आहे. शतकानंतर लगेचच जखरच्या गोलंदाजीवर तो बाद झाला. यशस्वीने ५० चेंडूत १६ चौकार आणि एका षटकारासह १०१ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. साईराज पाटील आणि अथर्व अंकोलेकर यांनी मुंबईच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. धावांचा पाठलाग करतानाची या स्पर्धेतली दुसऱ्या क्रमांकाची धावसंख्या आहे. शतकी खेळी साकारणाऱ्या यशस्वीलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. यशस्वीने सर्फराझला बोलावून त्याच्याबरोबर पुरस्कार शेअर केला.



## ग्रंथमित्र प्रा.धनंजय पवार यांचा सपत्नीक सत्कार



**लातूर/प्रतिनिधी** : हासाळा येथील श्री.गुणवंतराव रामचंद्र पाटील सार्वजनिक वाचनालयाचे सचिव प्रा.धनंजय पवार यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ.एस.आर.रंगनाथन् उत्कृष्ठ ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार मिळाल्याबद्दल दि.१० डिसेंबर मानवाधिकार दिनानिमित्त,वर्धा येथील लोक महाविद्यालयाच्यावतीने प्राचार्य डॉ.कमलताई गवई यांच्या हस्ते पत्नी सूचितासह भरपेहराव,शाल,स्मृतीचिन्ह,पुष्पहार घालून सन्मानीत करण्यात आले.

लोक शिक्षण प्रसारक मंडळ वर्धाच्यावतीने दि.१० डिसेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन आणि संस्थेचे प्रमुख संस्थापक दे.सी.हेमके गुरुजी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा.धनंजय पवार यांचा पत्नी सुचितासह महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष तथा लोकशिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ. कमलताई गवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी इंजि.डॉ.गोविंद कासट,साहित्यिक प्रा.डॉ.नारायण निकम,संस्थेचे प्रमुख कार्यवाह प्रकाश भोयर, कार्यक्रम संयोजक मोहन सोनूरकर,लोक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र सहारे,राज्य ग्रंथालय संघाचे सहकार्योपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले,राज्य ग्रंथमित्र पुरस्कार विजेते युवराज जाधव आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

## समर्थ साखर कारखान्याने घेतलेल्या ठेवी प्रकरणी आवश्यक असल्यास चौकशी करणार- मंत्री ना. बाबासाहेब पाटील




**नागपूर/प्रतिनिधी** : अंबड तालुक्यातील मौजे महाकाळ येथील समर्थ सहकारी साखर कारकाखान्याने सभासदांकडून घेतलेल्या ठेवी कायदेशीर असून कोणतीही फसवणूक झालेली नाही. मात्र आवश्यक वाटल्यास कारखान्याची चौकशी केली जाईल, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. समर्थ सहकारी साखर कारखान्याचा सभासदांकडून ऊस देयकातून करण्यात येत असलेल्या संबधी सदस्य हिकमत उढाण यांनी लक्षवेधी सूचना मांडली. लक्षवेधीस उत्तर देतांना मंत्री पाटील बोलत होते. मंत्री पाटील यांनी सांगितले की, सागर सहकारी साखर कारखाना नंतर नोंदणीकृत होऊन समर्थ कारखान्यात विलीन झाला. मात्र खोलेश्वर ग्रामीण बहुउद्देशीय सहकारी संस्था ही सहकार कायद्याच्या थेट कक्षेत येत नसल्याने तिची चौकशी शासनाकडे नाही. याबाबत संबंधितांनी धर्मादाय आयुक्तांकडे दाद मागावी. सर्वसाधारण सभा व वार्षिक सभेतील ठरावानुसार कारखान्याला ठेवी स्वीकारण्याची कायदेशीर तरतूद आहे. कारखान्याचा विस्तार, डिस्टिलरी व कोजन प्रकल्प उभारण्यासाठी अशा ठेवी पूर्वीही स्वीकारण्यात आल्या आहेत. २०१८ नंतर कोणतीही नवीन कपात झालेली नाही. २०२१ मधील ठरावानुसार ठेवींची मुदत २०२६ मध्ये संपत असून त्यानंतर सभासदांना रक्कम परत केली जाणार आहे. जर एखाद्या सभासदाने तत्काळ मागणी केली, तर कारखान्याला पैसे परत देण्याचे निर्देश दिले जातील, असेही सांगण्यात आले. मराठवाड्यातील समर्थसह अनेक साखर कारखाने गेली २० वर्षे 'अ' वर्गात असून राज्य व केंद्र शासनाकडून सन्मानित झाले आहेत. त्यामुळे सध्या प्रशासक नेमण्याचे कोणतेही कारण नाही. मात्र भविष्यात गंभीर तक्रारी आल्यास चौकशी करून न्याय देण्याची कार्यवाही केली जाईल, असेही मंत्री ना. पाटील यांनी सांगितले.

## मराठीच्या मुद्द्यावर सरकार 'ॲक्शन मोड' मध्ये! नियम मोडणाऱ्या शाळांची गय नाही; सरकारचे कडक कारवाईचे आदेश

**नागपूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात मराठी भाषेचा सन्मान राखण्यासाठी आणि ती प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. राज्यातील शाळांमध्ये मराठी सक्तीचा ऐतिहासिक निर्णय घेतल्यानंतर, आता या निर्णयाला बगल देणाऱ्या शाळांच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी सरकारने आक्रमक पवित्रा घेतला आहे. केंद्रीय मंडळाच्या शाळांनी मराठी विषय 'ऐच्छिक' ठेवल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याची गंभीर दखल घेत, अशा शाळांवर कडक कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत सरकारने आज विधान परिषदेत दिले.

मराठीची सक्ती, नाहीतर कारवाई!

फेब्रुवारी २०२४ मध्ये सरकारने राज्यातील सर्व माध्यम ांच्या आणि मंडळांच्या शाळांना मराठी भाषा शिकवणे अनिवार्य केले होते. हा निर्णय म्हणजे मराठी अस्मितेच्या जपणुकीसाठी टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल होते. मात्र, काही केंद्रीय शाळांनी या आदेशांचे पालन न करता मराठी विषय 'ऐच्छिक' ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे ८५,४९७ विद्यार्थ्यांना मराठीचे शिक्षण मिळाले नसल्याची बाब समोर येताच, सरकारने यावर तातडीने कठोर भूमिका घेतली आहे.

शाळांच्या मनमानीला बसणार चाप

आज विधान परिषदेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना सरकारने स्पष्ट केले की, ''राज्यात शाळा कोणत्याही मंडळाची असो, मराठी शिकावीच लागेल.'' सरकारी आदेश धाब्यावर बसवणाऱ्या शाळांची आता गय केली जाणार नाही. ज्या शाळांनी मराठी विषय सक्तीचा केलेला नाही आणि सरकारी निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही, अशा शाळांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर महाराष्ट्रात उभारण्यात येणार –मुख्यमंत्री फडणवीस

## एमएमआरडीए आणि ब्रुकफिल्ड कंपनी यांच्या संयुक्त नेतृत्वात प्रकल्प उभारणार

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि व्यवसाय-अनुकूल वातावरण या तीन घटकांमुळे महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी अग्रगण्य ठरत आहे. यावर्षी जाहीर केलेले नवीन ऋछउ धोरण राज्यात उच्च मूल्याच्या, कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले. ब्रुकफिल्ड कंपनीने मुंबईतील पवई येथे ६ एकर जागेवर २० लाख चौरस फूट भाडेतत्वावरील बांधकाम असलेला भव्य प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत बहुराष्ट्रीय बँकेचे आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (ऋछउ) स्थापन केले जाणार आहे.



हा करार २० वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या मोठ्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीबाबत जागतिक स्तरावर विश्र्वास दृढ झाला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या भविष्यातील गरजा पूर्ण करण्याबरोबरच, स्थिर आणि सक्षम वातावरण पुरवण्यास राज्य शासन तत्पर आहे. सदर प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण होणार असून, यामध्ये १ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे तसेच ३०,००० हून अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व ब्रुकफिल्ड यांच्या नेतृत्वाखाली भागीदार बी. एस. शर्मा यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, ही उभारणी महाराष्ट्रातील गुंतवणूकदार-अनुकूल वातावरणाबाबत जागतिक कंपन्यांचा वाढता विश्र्वास अधोरेखित करणारी आहे. प्रकल्पासाठी १०० टक्के हरित उर्जेचा वापर करण्याचे उद्दिष्ट असून इमारत बाजारातील सर्वोत्तम शाश्र्वत बांधकाम मानकांनुसार उभारली जाणार आहे. यामुळे मुंबईचे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर हब म्हणूनचे स्थान आणखी मजबूत होणार आहे. २०२४ मध्ये ब्रुकफिल्डने पुण्यात एका मोठ्या वित्तीय सेवा कंपनीसाठी 'बिल्ड-टू-सूट' टॉवर उभारला होता. याच वर्षी चचठऊ- सोबत १२ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. जून २०२५ मध्ये कंपनीने बांद्रा-कुर्ला संकुलात २.१ एकर जागा खरेदी केली आहे.

ब्रुकफिल्डचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी अंकुर गुप्ता म्हणाले , आशिया खंडातील कार्यालय विकास क्षेत्रात नवा मापदंड ठरेल असा हा आयकॉनिक प्रकल्प आम्ही उभारत आहोत. मुंबईत करण्यात आलेली गुंतवणूक आता ४ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. उच्च दर्जाची, शाश्र्वत आणि आधुनिक कार्यस्थळे निर्माण करण्यासाठी ब्रुकफिल्ड कटिबद्ध आहे.

ब्रुकफिल्ड ही भारतातील सर्वात मोठ्या कार्यालयीन मालक आणि ऑपरेटर कंपन्यांपैकी एक असून देशातील सात शहरांमध्ये सुमारे ५५ दशलक्ष चौरस फूट क्षेत्राचे व्यवस्थापन करते. उच्च दर्जाच्या, ग्रेड-A प्रकल्पांची विकास व संचालन क्षमता कंपनीने सातत्याने सिद्ध केली आहे. पवईतील प्रस्तावित प्रकल्पाला उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी, सामाजिक सुविधा व मोठ्या प्रमाणातील कुशल मनुष्यबळाचा लाभ मिळणार आहे.

## तिरुपती – पंढरपूर साप्ताहिक रेल्वेसेवा २० डिसेंबरपासून : संजय निलेगांवकर

**लातूर/प्रतिनिधी** : येत्या दि.२० डिसेंबर २०२५ पासून तिरुपती – पंढरपूर व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार आहे. यापूर्वी ही सेवा १३ डिसेंबरला सुरु होणार होती, मात्र ही रेल्वेसेवा आता २० तारखेपासून सुरु होत असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.

तिरुपती – पंढरपूर ही गाडी लातूरमार्गे सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती. त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे तिरुपती- पंढरपूर – तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०३२ ही तिरुपती – पंढरपूर – तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. ही गाडी यापूर्वी दि. दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून सुरु होणार होती. मात्र आता ती येणाऱ्या शनिवारपासून म्हणजे दि. २० डिसेंबर पासून सुरु होत आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल. या गाडीला रेणिगुंटा, राजमपेटा, ओंटिमिट्ट, कडपा, येरगुंटला, ताडिपत्रि, गूटी, डोन, कर्नूलु सिटी, गदवाल, वनपर्ती रोड, महबूबनगर, जडचर्ला, शादनगर, उमदानगर, काचीगुडा, सिकंदराबाद, बेगमपेट, लिंगमपल्ली, शंकरपल्ली, विकाराबाद, जहीराबाद, बीदर, भालकी, उदगीर, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाऊन, कुर्डूवाडी, मोडलिंब असे थांबे देण्यात आले आहेत. यामध्ये धाराशिव आणि बार्शी हे दोन थांबे वाढविण्यात आले आहेत. अगोदरच्या वेळापत्रकात हे थांबे नव्हते. ही एक सुविधा या गाडीसाठी वाढविण्यात आली आहे. ही गाडी दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २१ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०३२ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल. या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर , दोन एसी टू टिअर , ३ एसी थ्री टिअर , १४ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी जनरल , २ गार्ड कम ब्रेक व्हॅन असे एकूण २४ डबे असणार आहेत. ही सुविधा तूर्तास दि. २० डिसेंबर ते दि. १ फ ेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरु असणार आहे. प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले. रेल्वे प्रवाशांसाठी अतिशय आनंदाची आणि समाधानाची बाब म्हणजे येत्या शनिवारी निघणाऱ्या गाडीचे आरक्षण फुल्ल या झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली. प्रवाशांकडून असाच प्रतिसाद मिळाल्यास ही गाडी पुढील काळात नियमित करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू असेही संजय निलेगांवकर यांनी सांगितले.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. शशिकांत स्वामी यांना पी.एचडी पदवी प्राप्त



**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील संगणक विभाग प्रमुख प्रा. शशिकांत वीरभद्र स्वामी यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून प्रतिष्ठित डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पी.एचडी) पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला आहे.

प्रा. शशिकांत स्वामी यांचा संशोधन विषय ''पोस्टमार्टम आयरीस रिकग्निशन विथ डीप लर्निंग बेस्ड सेगमेंटेशन'' असा असून, आधुनिक तंत्रज्ञान व डीप लर्निंगच्या माध्यमातून ओळख प्रणाली अधिक अचूक व प्रभावी कशी करता येईल, यावर हे संशोधन आधारित आहे. या संशोधनासाठी त्यांना डॉ. गजानन कुरुंदकर, सहप्राध्यापक, संगणक शास्त्र विभाग, श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय, पूर्णा (जि. परभणी) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदर संशोधन स्कूल ऑफ कॉम्प्युटेशनल सायन्सेस, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे पूर्ण करण्यात आले असून, त्यांना दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी पी.एचडी प्रदान करण्यात आली.

या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्त सचिव श्री. विशाल लाहोटी कोषाध्यक्ष श्री.संजय बोरा यांनी अभिनंदन केले. तसेच प्रा. शशिकांत स्वामी यांना पी.एचडी पदवी प्राप्त झाल्यामुळे दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, अधिक्षक श्री. संजय व्यास तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## सामान्य लोकांचे जगणे काव्य साहित्यात यावे- मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे

### '२१ व्या शतकातील उर्दू नज्म' (कविता) विषयी मुक्त विद्यापीठात साहित्य अकादमीच्या सहकार्याने परिसंवाद संपन्न

**नाशिक/प्रतिनिधी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात साहित्य अकादमी (संस्कृती मंत्रालय, नवी दिल्ली) व विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने '२१ व्या शतकातील उर्दू नज्म' (कविता) या विषयी एक दिवसीय परिसंवाद संपन्न झाला. या परिसंवादाचे उद्धाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. व्यासपीठावर प्रसिद्ध उर्दू विद्वान आणि पत्रकार डॉ. मेहताब आलम (भोपाळ), साहित्य अकादमी (हिंदी) चे संपादक श्री. अनुपम तिवारी (दिल्ली), विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

परिसंवाद उद्धाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की भाषा संवादाचे परिवर्तनाचे माध्यम आहे. सुरुवातीपासून मनुष्याला माणुसकीपर्यंत नेणे कायम ठेवणे या कामात भाषेचे महत्व अनन्यसाधारण राहिलेले आहे. त्यातही काव्याचा वाटा मोठा आहे. उर्दुसह इतर कुठल्याही भाषेतील सकस साहित्य सामान्य लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. त्याचबरोबर सामान्य लोकांची भाषा, त्यांचे जगणे काव्य साहित्यात प्रखरपणे आले पाहिजे. कालानुरूप संगणक ते ए. आय. अशी क्रांती झाली असली तरी भारतीय सहजीवनातील विविध घटकांचा शोध घेत मांडत रहावा आणि भाषेबाबतच्या चांगल्या मूल्यांचा प्रसार करावा असे आवाहन मा. कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी केले. प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना डॉ. मेहताब आलम म्हणाले की कुठलीही भाषा ही कुणा एकाची मक्तेदारी नसून जो भाषेची साधना करतो त्याची ती भाषा असते. २१ व्या शतकात उर्दू कवितेने विचारांना व्यापकता आणि खोली दिली आहे. या शतकातील कवितेत उपेक्षित विषयांसह स्त्रीवाद, दलित आणि शेतकरी वर्गाचे प्रश्न मांडलेले दिसून येतात, हे उदाहरणांसह सांगितले. भगवान श्रीराम, श्रीकृष्ण आदींसंबंधी उर्दू भाषेत झालेल्या कवितांचा उल्लेख करत त्यांनी २१ व्या शतकातील उर्दू कवितेचे विषय, स्वरूप आणि तंत्र यावरदेखील प्रकाश टाकला.

साहित्य अकादमी (हिंदी) चे संपादक अनुपम तिवारी यांनी आपल्या स्वागतपर भाषणात आधुनिक उर्दू कवितांची सविस्तर माहिती दिली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी हिंदी व उर्दू भाषेत फार फरक नसल्याचे सांगत भाषा हृदयांना




आणि माणसांना जोडण्याचे काम करत असल्याचे सांगितले. डॉ. नागार्जुन वाडेकर यांनी विद्यापीठ तसेच मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या शिक्षणक्रमांची व विविध उपक्रमांची माहिती दिली. उद्धाटन सत्रानंतरच्या परिसंवादाचे अध्यक्षपद उर्दूच्या प्रख्यात लेखिका डॉ. सादिका नवाब सहर यांनी भूषवले. त्यातील प्रथम सत्रात स्तुती अग्रवाल, डॉ. सय्यद नूरुल अमीन आणि डॉ. अबरार अहमद यांनी तर द्वितीय सत्रात डॉ. तनवीर हसन, दानिश गनी आणि डॉ. रशीद खान यांनी उर्दू कवितेविषयीचे आपापले शोधनिबंध सादर केले. मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. रशीद अशरफ खान यांनी परिसंवादाचे समन्वयन केले. सूत्रसंचालन धम्मरत्न जावळे व रूपाली गायकवाड यांनी तर डॉ. शाहीन शेख यांनी आभार प्रदर्शन केले.

## पुणे-संभाजीनगर अंतर फक्त २ तासात होणार पार, नितीन गडकरींकडून ग्रीन फील्ड सुपर हायवेची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजप नेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यांनी पुणे ते संभाजीनगर या दोन शहरांना जोडणारा नवीन महामार्ग बांधला जाणार असल्याची माहिती दिली आहे. हा प्रकल्प १६ हजार ३१८ कोटींचा असून यामुळे पुणे संभाजीनगर हे अंतर अवघ्या दोन तासांवर येणार असल्याची माहितीही गडकरी यांनी दिली आहे. सध्याच्या घडीला पुण्याहून संभाजीनगरला जायला किमान सहा ते साडेसहा तास लागतात. हे अंतर आता जवळपास निम्म्याहून कमी होऊन अवघ्या दोन तासांवर येणार आहे. या प्रकल्पाविषयी माहिती देताना गडकरी यांनी सांगितलं की, आम्ही पुणे ते संभाजीनगर हा नवीन एक्स्प्रेस हायवे बांधत आहोत. यासाठी १६ हजार ३१८ कोटींचा खर्च येणार आहे. याचा एमएयू झाला असून पहिला रस्ता पुणे, अहिल्यानगर आणि संभाजीनगर असा असणार आहे. तो रस्ता आधी पूर्णपणे चांगला करणार आहे. यावर काही ठिकाणी पूल बांधले जाणार आहेत. यासाठी दोन हजार कोटी खर्च केले जाणार आहेत. या व्यतिरिक्त आपल्याला दुसरा रस्ता शिक्रापूर येथून जाणार आहे. हा रस्ता अहिल्यानगरच्या बाहेरून थेट बीड जिल्ह्यात जाईल आणि तिथून तो संभाजीनगरपर्यंत जोडला जाईल. हा ग्रीन फिल्ड हायवे असणार आहे. या हायवेसाठी १६ हजार ३१८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यात सगळ्या गोष्टी जवळपास पूर्ण झाल्या आहेत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## Change of Name Declaration

Here in this advertise I am declaring that I have change My Name which was: KAZI MOHAMMAD BURHANUDDIN
TO: KAZI BURHANODDIN NASIRUDDIN
Hence for this Declaration i will be known by this name and will use. In future the KAZI BURHANODDIN NASIRUDDIN will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME: - : **KAZI MOHAMMAD BURHANUDDIN**
NEW NAME: - **KAZI BURHANODDIN NASIRUDDIN**
Address:-LOHAR GALLI, OSNANABAD.TAL& DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO: - 710311552885
Mobile. No.-8888209088

## Change of Name Declaration

Here in this advertise I am declaring that I have change My Name which was: **KAZI TABASUM MOHAMMAD BURHANUDDIN**
TO : **TABASUM BURHANODDIN KAZI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use. In future the TABASUM BURHANODDIN KAZI will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME: - : **KAZI TABASUM MOHAMMAD BURHANUDDIN**
NEW NAME: - **TABASUM BURHANODDIN KAZI**
Address:-16/47, LOHAR GALLI, OSNANABAD. TAL& DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO: - 954957075388
Mobile. No.-7972384268

## Change of Name Declaration

Here in this advertise I am declaring that I have change My Name which was: **KAZI MUBASHIRODDIN NASIRODDIN**
TO : **KAZI MUBASHIRODDIN BURHANODDIN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use. In future the TABASUM BURHANODDIN KAZI will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME: - : **KAZI MUBASHIRODDIN NASIRODDIN**
NEW NAME: - **KAZI MUBASHIRODDIN BURHANODDIN**
Address:-16/47, LOHAR GALLI, OSNANABAD. TAL& DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO: - 937364907478
Mobile. No.-9112346600

## Change of Name Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **NAWAB FAROOQ PASHA**
TO: **SHAIKH FARUQ A. KARIM**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SHAIKH FARUQ A. KARIM in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **NAWAB FAROOQ PASHA**
NEW NAME :- **SHAIKH FARUQ .A. KARIM**
Address - Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-938038149760 Mob.9545508314

## Change of Name Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **DEVI SING** TO: **DEVISING ARJUNSING RATHOD**
Hence for this Declaration i will be known by this name and will use DEVISING ARJUNSING RATHOD in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **DEVI SING**
NEW NAME :- **DEVISING ARJUNSING RATHOD**
Address - New Aroygya Nagar Omerga Taluka Omerga Dist Osmanabad. -413606
Adhar n.- 29021883736 Mob.9923938883

## Change of Name Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KURESHI SADIK NISAR** TO: **SADIK NISARAHEMAD QURESHI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SADIK NISARAHEMAD QURESHI in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KURESHI SADIK NISAR**
NEW NAME :- **SADIK NISARAHEMAD QURESHI**
Address - Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-533115098044 Mob.8484849293

## Change of Name Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KURESHI SADIQ NISAR**
TO: **SADIK NISARAHEMAD QURESHI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SADIK NISARAHEMAD QURESHI in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KURESHI SADIQ NISAR**
NEW NAME :- **SADIK NISARAHEMAD QURESHI**
Address - Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-533115098044 Mob.8484849293


# लातूर-कल्याण 'जनकल्याण' द्रुतगती मार्गाला ऐतिहासिक मंजुरी

## लातूर-मुंबई प्रवास अवघ्या ५ तासांत!; आ. अभिमन्यू पवार यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा विकासात नवा मैलाचा दगड ठरणाऱ्या लातूर-कल्याण 'जनकल्याण' द्रुतगती मार्गाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. 'इन्फ्रामॅन' अशी ख्याती असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या या महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे लातूर-मुंबई हा दीर्घकाळाचा प्रवास आता फक्त पाच तासांत पूर्ण होणार असून, मराठवाड्याच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळणार आहे.या मार्गबदलासाठी औशाचे आमदार अभिमन्यू पवार आणि मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनजी कथोरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.








सुमारे ४४२ किलोमीटर लांबीच्या या द्रुतगती महामार्गासाठी अंदाजे ३५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) मार्फत राबविण्यात येणार आहे. या महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) लवकरच तयार करण्याचे काम सुरू होणार आहे. लातूर जिल्ह्याच्या औद्योगिकरणासह दळणवळण, व्यापार, शिक्षण व आरोग्य क्षेत्रासाठी हा मार्ग नवसंजीवनी ठरणार आहे.दरम्यान, कल्याणमार्गे मुंबईकडे जाताना होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी लातूर-अहिल्यानगर-माळशेज घाट मार्गे बदलापूर-वडोदरा एक्स्प्रेस वे वरील बोगद्यातून पनवेल-जेएनपीटी पर्यंत थेट जोडणी करण्याचा महत्त्वपूर्ण बदल या प्रकल्पात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनांना अटल सेतू किंवा मुंबई-गोवा द्रुतगती मार्गावरून विना अडथळा मुंबईत प्रवेश करता येणार आहे.

या मार्गबदलासाठी औशाचे आमदार अभिमन्यू पवार आणि मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनजी कथोरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. ६ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांनी यासंदर्भात निवेदन दिले होते. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी MSRDC चे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांना या सूचनेची सखोल तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसारच आता सुचवलेले बदल ग्राह्य धरून उड्डाण तयार करण्यात येत आहे.या संपूर्ण प्रक्रियेत MSRDC व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांची सकारात्मक व निर्णायक भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे. या द्रुतगती मार्गामुळे लातूर, अहमदनगर, पुणे, नांदेड तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील दळणवळण अधिक सुलभ होणार असून, मालवाहतूक, उद्योग व रोजगारनिर्मितीस मोठा चालना मिळणार आहे.

या ऐतिहासिक प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे लातूर जिल्ह्याच्या वतीने आमदार अभिमन्यू पवार यांनी आभार मानले आहेत. 'जनकल्याण' हे नाव सार्थ ठरणारा हा द्रुतगती मार्ग मराठवाड्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने वायुगती देणार, यात शंका नाही.

# पूजा वाघमारे च्या वाढदिवसानिमित्त प्रशालेत २१ स्कूल बॅग चे वाटप

तुळजापूर (विजय पिसे)- तालुक्यातील जळकोट येथील संतोष वाघमारे यांची कन्या पूजा संतोष वाघमारे ही बी ए एम एस या दुसऱ्या वर्षा मध्ये वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेत आहे . तिचा दिनांक १२ डिसेंबर रोजी २१ वा जन्मदिवस आहे त्यानिमित्ताने संतोष वाघमारे यांनी वाढदिवसाला होणारा विनाकारण खर्च टाळून त्यांनी जिल्हा परिषद प्रशाला जळकोट येथील आठवी ते दहावीपर्यंतच्या गरीब, होतकरू, हुशार अशा विद्यार्थिनी साठी २१ स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद प्रशालेत वाढदिवस साजरा करण्यात आला व तिच्या उज्वल आयुष्यासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी शालेय शिक्षण समिती चे उपाध्यक्ष पत्रकार विजय पिसे, पत्रकार अरुण लोखंडे, संतोष वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते हणमंत सुरवसे, सदाशिव हासुरे, पोलीस दलात कार्यरत असलेले विश्वनाथ कदम, अरविंद लोखंडे, तुकाराम कुंभार, निजाम जमादार व तसेच शाळेचे मुख्याध्यापक संतोष सारणे सर, जयराम शिंदे सर, डावरे सर, पुष्पलता कांबळे मॅडम, बनपट्टे सर आधी उपस्थित होते.

# नाट्य चळवळ वाढीसाठी नागरिक आणि कलावंतांनी नाट्य परिषदेचे सभासद व्हावे - विशाल शिंगाडे

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, धाराशिव शाखा मागील १४ वर्षांपासून जिल्ह्यात सक्रियपणे कार्यरत असून नाट्य चळवळीला बळकटी देण्याचे काम सातत्याने करत आहे. जिल्ह्यात नाट्य चळवळ व्यापक प्रमाणात वाढली असून सर्व नागरिक व कलावंतांनी नाट्य परिषदेचे सभासद व्हावे,असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नियामक मंडळ मुंबईचे सदस्य तथा धाराशिव नाट्य परिषदेचे अध्यक्ष विशाल शिंगाडे यांनी केले.

शुक्रवार, १२ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात शाखेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला डॉ. अभय शहापूरकर, राजेंद्र अत्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नटराज यांच्या मूर्तीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

पुढे बोलताना विशाल शिंगाडे म्हणाले की, देशाचे नेते पद्मविभूषण शरद पवार यांच्या वाढदिवसा निमित्त १२ डिसेंबर २०११ रोजी धाराशिव शाखेची स्थापना झाली. या काळात शहर आणि जिल्ह्यातील अनेक नाट्य विषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

धाराशिव मधील बंद पडलेली नाट्य परंपरा पुन्हा रुजवण्यासाठी परिषदेनं पुढाकार घेतला. नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली १६०० कलावंतांचा भव्य मेळावा घेण्यात आला. दरवर्षी एकांकिका स्पर्धा व मेळाव्यांचे आयोजन आजही सुरू आहे.

तुळजाभवानी आणि येडाईची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धाराशिव मध्ये लोक कलावंतांची मोंठी खाण आहे. मागील २० वर्षांपासून सम्राट नाट्य संस्था आणि धनंजय शिंगाडे बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या पुढाकारातून आराधी-पिंगळा, गरबा, जोगवा पिंगळी, वाघ्या-मुरळी, लोकगीत, भारूड, लोकनृत्य यांसारख्या सादरीकरणांची परंपरा जपली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

बालनाट्य शिबिरे, उस्मानाबाद एकांकिका महोत्सव, शंभराव्या नाट्य संमेलना निमित्त विभागीय संमेलन यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करून बाल-युवा पिढीला मंच उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे शिंगाडे यांनी सांगितले.

# अकरावीची अकरावी प्रवेश फेरी; तरी जिल्ह्यात १३,१९७ जागा रिक्त

धाराशिव (प्रतिनिधी)- यंदा पहिल्यांदाच राज्यात अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन झाली. त्यानुसार मे महिन्याच्या अखेरीस सुरू झालेली अकरावीची प्रवेशप्रक्रिया डिसेंबर महिना निम्मा संपला तरी अजूनही सुरूच आहे. धाराशिव जिल्ह्यात अकरावी प्रवेशासाठी २८,१०० जागा उपलब्ध करून दिल्या होत्या. यापैकी १४,९०३ जागांवर प्रवेश झाले असून, १३,१९७ जागा रिक्त आहेत. लातूर विभागात अकरावीच्या तब्बल ६७,००० जागा रिक्त आहेत. त्यामुळे प्रवेशापासून कोणीही वंचित राहू नये म्हणून शिक्षण विभागाने प्रवेशाची विशेष फेरी सुरू केली आहे. ही अंतिम फेरी असल्याचे शिक्षण विभागाचे म्हणणे आहे. सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून सरकारने प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन राबवली. अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑक्टोबरमध्ये पूर्ण झाल्यानंतर शिक्षण संचालनालयाने मंगळवारी (दि. ९) रात्री अचानक विशेष फेरी जाहीर केली. त्यानुसार ही विशेष अंतिम फेरी दि. १० ते १६ डिसेंबरदरम्यान राबवण्यात येत आहे. या फेरीसाठी बुधवारी दुपारी १२ वाजेपासून गुरुवारी सकाळी १० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना नोंदणी व भाग १ अकरावी प्रवेशासाठी विद्यार्थी नोंदणी तसेच, दहावीची पुरवणी परीक्षा उत्तीर्ण व एटीकेटी विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरी बुधवारी (दि.१०) सुरू झाली. गुरुवारीपर्यंत नोंदणी, अर्जाच्या भाग एकमध्ये दुरुस्तीची मुदत दिली होती. त्यानंतर रिक्त जागांचा अर्जाचा दुसरा भाग भरणे, महाविद्यालयाचे प्राधान्यक्रम भरण्यासाठी शुक्रवारीपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर १३ डिसेंबर रोजी अलॉटमेंट पोर्टलवर जाहीर झाली. त्यानुसार एसएमएसद्वारे महाविद्यालयाची माहिती दिली जाणार आहे. त्यानंतर दि. १६ ते १७ डिसेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करावा. भरण्यासाठी संधी दिली. विशेष फेरीसाठी पोर्टलवर अलॉटमेंट जाहीर करून दि. १५ डिसेंबरपर्यंत एसएमएसद्वारे पसंतीचे महाविद्यालय कळवले जाणार आहे. कधी तांत्रिक बिघाड तर कधी पूर परिस्थितीमुळे अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा ११ वीचे दुसरे सत्र सुरु झाले तरी अजून प्रवेश प्रक्रिया सुरुच आहे. ऑक्टोबरमध्ये प्रक्रिया पूर्ण झाली होती तरी आता मुदतवाढ दिल्याने ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अयशस्वी ठरल्याची टीका पालकांसह शिक्षकांतूनही होत आहे.

# पॅन्थर लाईन कंडक्टर (वायर्स) व इतर साहित्याची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२८.०२.२०२५ रोजी मानेवाडी हगलुर तांडा शिवारातील रिन्यु ग्रीन एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि. या कंपनी चे ०.४४ किमी लांबीच्या फिडर-२ चे पॅन्थर लाईन कंडक्टर (वायर्स) व इतर साहित्य एकुण ९०,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रावसाहेब भानुदास शेंडे, वय ४३ वर्षे, रा. हरोली ता. कवठे, महाकाळ जि. सांगली ह.मु. एस टी कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१२.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# नवोदय परीक्षेला ८,२६७ जणांची हजेरी तर ३०० विद्यार्थ्यांची दांडी

धाराशिव (प्रतिनिधी)- केंद्र सरकार संचालित पीएमश्री नवोदय विद्यालयात आगामी शैक्षणिक वर्षात सहावीसाठीची प्रवेश परीक्षा शनिवारी (दि. १३) सकाळी ११:३० ते १:३० यादरम्यान धाराशिव जिल्ह्यातील २९ परीक्षा केंद्रावर शांततेत पार पडली. या परीक्षेसाठी ८,५६७ विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेसाठी अर्ज भरले होते. त्यापैकी शनिवारी २९ केंद्रांवर ८,२६७ विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेचा पेपर दिला. असे असले तरी सकाळी वेळेत न पोहोचता आल्याने तसेच थंडीचे दिवस असल्याने परीक्षेसाठी २९ केंद्रांवरील जवळपास ३०० विद्यार्थ्यांची गैरहजेरी दिसून आली. धाराशिव जिल्ह्यातील २९ केंद्रांवरील परीक्षेसाठी तब्बल ८ हजार ५६७ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज केल्याने अर्जाची संख्या मागील वर्षीच्या तुलनेत जास्त अर्ज आले होते. त्यामुळे तुळजापूरच्या नवोदय विद्यालयात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता सहावीसाठी होणाऱ्या परीक्षेसाठी मोठी रस्सीखेच होणार आहे. परीक्षा केंद्रावर परीक्षार्थींनी प्रवेशपत्र, परीक्षा लेखन साहित्य व ओळखपत्रासह सकाळी १०:३० पर्यंत उपस्थित राहण्याचे आवाहन केल्यामुळे शनिवारी सकाळी ९ वाजतापासूनच अनेक पालक आपल्या पाल्यांसह शहरात येताना दिसत होते. सकाळी १० वाजता विविध केंद्रावर पालकांसह विद्यार्थ्यांची गर्दी झाल्यासचे चित्र दिसत होते. सकाळी १० वाजतापासूनच पालकांनी पाल्यांना सोडण्यासाठी शहरातील परीक्षा केंद्रांवर लांब रांगा लावल्या होत्या.

थंडीतही परीक्षा केंद्रांवर रांगा विशेष थंडीमुळे आपल्या वाहनातून अनेकजण आल्याने परीक्षा केंद्रासमोर लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. नवोदय परीक्षेसाठी किमान एक तास आधी येण्याच्या सूचना दिल्याने ग्रामीण भागासह शहरी भागातील पालकांनी सकाळी ९ वाजतापासूनच हजेरी लावली. विद्यार्थ्यांनी परिक्षेची जास्त भीती घेऊ नये, यासाठी भरारी पथकांनी विद्यार्थ्यांची कसून तपासणी न करता प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांवर बारकाईन लक्ष ठेवत पाहणी केली. परीक्षा सुरळीत पार पडली जिल्ह्यात २९ केंद्रांवर नवोदय प्रवेश परिक्षा शनिवारी शांततेत पडली. २९ केंद्रावर जिल्ह्यासतील ८,२६७ विद्यार्थ्यांनी आगामी शैक्षणिक वर्ष इयत्ता सहावीसाठी नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा दिली. सर्व परीक्षा केंद्रावर सुविधा उपलब्ध होत्या.

# परंड्यातील पूरग्रस्त शाळांना २५ लाखांचे साहित्य

परंडा(प्रतिनिधी)-परंडा तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांचे सप्टेंबर महिन्यात आलेल्या महापुरामुळे प्रचंड नुकसान झाले होते. पुण्यामधील टीचिंग लर्निंग कम्युनिटी या संस्थेने तालुक्यातील या पूरग्रस्त शाळांना भरीव मदत करून मोठा आधार दिला आहे. तालुक्यातील नऊ पूरग्रस्त शाळांना २५ लाख रुपयाची शैक्षणिक मदत टीचिंग लर्निंग कम्युनिटी पुणे या संस्थेने केली आहे. यामध्ये स्वच्छतागृह, संगणक ,स्मार्ट टीव्ही, टॅब, डिजिटल बोर्ड अशा अत्यंत महत्त्वाच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप या संस्थेच्या माध्यमातून शाळांना करण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवगाव खुर्द या ठिकाणी हा साहित्य वाटप कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी सूर्यभान हाके, शिवाजी पुजारी, पिकवने, टीएलसी या संस्थेचे सुहास शिंदे, बाळासाहेब जोगदंड, ज्ञानेश मोरे, संतोष नाईक, शिवानंद बनसोडे, पांडुरंग जीतकर, धनाजी पवार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अंकुश डांगे यांनी केले.

टीएलसीचे प्रमुख श्री शिवाजी पुजारी म्हणाले, आम्हाला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद वाटत आहे. गटशिक्षणाधिकारी सूर्यभान हाके यांनी तालुक्याच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करत दिलेल्या साहित्याचा योग्य प्रकारे वापर करून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवू, असे आश्वासन दिले.

यापुढेही शाळांना अशाच प्रकारे मदत करत राहू टीचिंग लर्निंग कम्युनिटीपुणे या संस्थेने २५ लाख रुपये निधी खर्च करून परंडा तालुक्यातील या जिल्हा परिषद शाळा डिजिटल केल्याने त्यांच्या या सेवा कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

इथून पुढेही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशीच सेवा करत राहू, असे टीएलसी सदस्यांनी सर्वांना आश्वासन दिले या कार्यक्रमासाठी शिक्षक, विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. विद्यार्थ्यांना सुविधा निर्माण झाली.


निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649